गुरुवार, २० जुलै २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -३०३
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● THURSDAY 20 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-303 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5



खुलताबाद, जगप्रसिद्ध वेरूळ लेणी येथील लेणी क्रमांक २९ चा सीतेची न्हाणी म्हणून ओळखला जाणारा धबधबा सध्या पर्यटकांचे चांगलेच आकर्षण ठरत आहे. मागील काही दिवसांपासून खुलताबाद, वेरूळ, म्हैसमाळ परिसरात पावसाच्या सरी कोसळत आहेत. बुधवारी दुपारी तीन वाजेपासून येथे पाऊस सुरू झाला आहे. त्यामुळे जगप्रसिद्ध वेरूळ लेणीचा धबधबा मागील काही दिवसांपासून कोसळत असून पर्यटक धबधबा बघण्यासाठी मोठी गर्दी करत आहेत. अनेक जण या धबधब्यासोबत सेल्फी घेताना दिसत आहेत.

# राज्यभर पावसाचा जोर

## जनजीवन विस्कळीत; अनेक रेल्वे रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : संपूर्ण राज्यात दोन दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे अनेक नदीनाले तुडुंब भरून वाहत आहेत. तर काही नद्या दुथडी भरून वाहत असल्याचे चित्र आहे. बुधवारी दिवसभर कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. त्यामुळे काही मार्ग बंद करण्याची वेळ प्रशासनावर आली होती. पावसामुळे अनेक रेल्वेगाड्याही रद्द करण्यात आल्या आहेत. कल्याण ते कसारा अप-डाऊन मार्गावरील रेल्वे वाहतूक पुढील सूचना मिळेपर्यंत बंद राहणार आहे.**

### बुलढाण्यात 636 मिलिमीटर पाऊस

बुलढाणा जिल्ह्यात काल रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. यामध्ये जिल्ह्यात 636 मिलीमीटर पाऊस झालाय तर 19 महसूल मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान मलकापूर नळगंगा नदीचे पाणी पुलावरून वाहत असल्याने महामार्गावरील वाहतूक काही वेळासाठी ठप्प झाली होती, तर मलकापूर तालुक्यातील धरणगाव येथे घराचे भिंत पडल्याने चार जनावरांचा मृत्यू झाला आहे. तसेच नांदुरा तालुक्यातील मामुलवाडी येथील मंदिराची भिंत कोसळून नामदेव गावंडे यांचा जागीच मृत्यू झाला आहे, तर त्यांचा मुलगा शुभम गावंडे हा जखमी झाला असून रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### कोल्हापुरात राजाराम बंधारा पाण्याखाली

गेल्या दोन दिवसांपासून कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे राजाराम बंधाऱ्यासह नऊ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. तसेच हिरण्येकेशी नदीच्या पातळीत वाढ झाल्यामुळे नदीवरील पुलावर पाणी आले आहे.

येत्या 48 तासांमध्ये कोल्हापूरमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. सततच्या पावसामुळे जिल्ह्यातील 14 धरणाच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे.

### वाशिममध्ये गावांचा संपर्क तुटला

वाशिम जिल्ह्यात काल रात्री झालेल्या मुसळधार पावसाने जिल्ह्यातील कारंजा आणि मंगरूळपीर तालुक्यात अनेक गावात जनजीवन विस्कळीत झाले आहे तर नदीकाठचे गावांचा संपर्क तुटला आहे तर मोठ्या प्रमाणात शेती पाण्याखाली गेल्याने शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालंय.

### अकोला जिल्ह्यातही मुसळधार

अकोला जिल्ह्यात काल रात्री झालेल्या पावसाने मोठा हाःहाकार उडालीय. या पावसाचा सर्वाधिक फटका मुर्तिजापूर आणि बार्शीटाकळी तालूक्याला बसलाय. मुर्तिजापूर तालूक्यातील खरब ढोरे, चिखली, दाळंबी, कोळंबीसह बार्शीटाकळी तालूक्यातील मोर्हळ गावाला या गावांना पुराचा मोठा फटका बसलाय. अकोल्यातही अनेक सखल वस्त्यांमध्ये पुराचे पाणी घुसले आहे.

### जळगाव जिल्ह्यात अतिवृष्टी

जळगाव जिल्ह्यात रावेर तालुक्यातील अतिवृष्टी झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. जोरदार आणि मोठ्या प्रमाणावर झालेज्या या पावसामुळे सुकी नदीला मोठा पूर आला आहे. या पुरामुळे रावेर तालुक्यातील विवरे गावातील काही घरांमध्ये पाणी शिरल्याने नुकसान झाले आहे. या पुराच्या पाण्यात एक चार चाकी आणि पुनगाव येथील पुलाचा भराव वाहून गेल्याने मोठी दाणादाण उडाली आहे.

### साताऱ्यात घाटात दरड कोसळली

साताऱ्याच्या अंबेनळी घाटात पाच ठिकाणी दरड कोसळली. कुंबळवणे, चिरेखिंड गावाजवळ दरड कोसळलीय. काल दिवसभर सुरू असलेल्या पावसामुळे दरड कोसळली. त्यामुळे हा घाट वाहतुकीसाठी पूर्ण बंद करण्यात आला आहे. तर महाबळेश्वरमध्ये मुसळधार पावसामुळे वेण्णा नदीला पूर आला आहे. पुराचे पाणी शेतात शिरल्याने शेतीचे नुकसान झाले आहे. वेण्णा नदीचे पाणी पाचगणी रोडवर आले आहे.

### चंद्रपुरात , शाळा महाविद्यालयांना सुटी

चंद्रपूर शहरात काल तब्बल 260 मिमी पावसाची नोंद झाली आहे. यापूर्वी 4 जुलै 2006 मध्ये 230 मिमी पाऊस झाला होता. या पावसामुळे चंद्रपूर शहरातील मच्छी नाला परिसर, आझाद बगीचा आणि बिनबा गेट परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी जमा झाले होते. दुपारी 4:30 पासून पावसाने पूर्णपणे विश्रांती घेतल्याने पावसाचं पाणी उतरलं आहे. मात्र हवामान खात्याने आजदेखील चंद्रपूरला ऑरेंज अलर्ट दिल्याने जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील सर्व शाळा-महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे.


# शेतकरी प्रश्नांवर सरकार गंभीर नाही

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील भाजपाप्रणित ट्रिपल इंजिन सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर गंभीर नाही. सरकार कर्ज वाटप व बियाणांसंदर्भात चुकीची माहिती देत आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने निर्देश जारी केल्याने अनेक सहकारी बँकांनी कर्ज वाटपच केले नाही, राष्ट्रीयकृत बँका तर शेतकऱ्यांना दारातही उभे करत नाहीत आणि सरकार सांगते कर्जवाटप झाले. सरकार चुकीचे उत्तर देत असून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा हा प्रकार आहे, असा संताप प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केला.

विधानसभेतील चर्चेत भाग घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सरकार तोफ डागली. ते पुढे म्हणाले की, बियाणे व खतांच्या किंमती वाढल्याने शेतकरी संकटात आहे का ? बँका कर्ज देत नसल्याने शेतकऱ्यांना सावकाराकडे जावे लागते का ? असे प्रश्न विचारण्यात आले असता, हे खरे नाही, असे धादांत खोटे व चुकीचे उत्तर सरकारकडून देण्यात आले आहे. अनेक सहकारी बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज वाटप केलेले नाही. बियाणे खतांच्या किमती वाढलेल्या आहेत, बोगस बियाणांचा सुळसुळाट आहे. मंत्र्यांच्या नावाने धाडी टाकून व्यापाऱ्याकडून वसुली करण्यात आली, त्यावर सरकारने काय कारवाई केली, असे प्रश्न पटोले यांनी उपस्थित केले. राज्यात लाखोंच्या संख्येने बीएड, डीएड व सीईटी परिक्षा पास झालेले विद्यार्थी आहेत. शिक्षक भरतीसाठी त्यांचा विचार करण्यापेक्षा सरकारने मात्र निवृत्त शिक्षकांना २० हजार रुपये मानधनावर नियुक्त करणार असल्याचा अफलातून जीआर काढला आहे. पुणे, मुंबईसह अनेक शहरात सरकारच्या या अन्यायी जीआर विरोधात तरुण मुले भर पावसात आंदोलन करत आहेत. राज्यात जिल्हा परिषदांच्या शाळांची स्थिती अत्यंत वाईट आहे, भंडारा जिल्ह्यात फंडातून शाळा चालू ठेवावी लागली. या विषयाची सरकारने तातडीने दखल घ्यावी तसेच सरकारने या विषयावर निवेदन करावे, अशी मागणी पटोले यांनी केली.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# स्वदेशीची जादू

आधुनिक केसरी

हे सगळे पदार्थ आणि कोल्ड ड्रिंक्स कधीतरी ठीक आहेत पण वारंवार खाल्ल्याने अनेक आजारांना निमंत्रण मिळू शकते. या पदार्थांमध्ये कॅलरीज आणि अतिरिक्त साखर असते. पौष्टिक तत्वे मात्र नगण्यच असतात ! जास्त फॅट, अतिरिक्त साखर आणि मीठ यामुळे हे पदार्थ चविष्ट तर बनतात पण आरोग्यावर दुष्परिणाम करतात. रक्तातील बॅड कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढवतात. या पदार्थांनी टाईप टू डायबिटीस, हृदयविकार आणि उच्च रक्तदाबाचा धोका वाढतो. वजनात वाढ होणे, श्वसन संस्थेचे आजार बळावणे असेही दुष्परिणाम होऊ शकतात. चायनीज खाद्यपदार्थांमध्ये अजिनोमोटो नावाचा घटक वापरतात. त्याला चायनीज सॉल्ट असेही म्हटले जाते. त्यामुळे खाद्यपदार्थांना एक वेगळी चव येते. तरुणाई विशेष करून या पदार्थांकडे आकृष्ट होते. या पदार्थांची लहान मुलांना लवकर सवय लागते. पण वारंवार असे पदार्थ खाणे आरोग्याला घातक ठरते. आपल्याकडील भाकरी, पोळी, भाज्या, पोहे, थालीपीठ इ देशी पदार्थात भरपूर फायबर्स असतात. आरोग्यासाठी ते उपकारक असतात. त्यात अनेक पोषक तत्वे असतात. आपण ते करताना अतिरिक्त साखर, मीठ इ चा वापर करत नाही. त्यामुळे त्यांच्या दुष्परिणामापासूनही दूर राहतो. आपल्या देशात आणि आपल्या राज्यात स्थानिक पातळीवर निर्माण झालेल्या वस्तू, वनस्पती, फळे, फुले या सगळ्या गोष्टी आपल्या आरोग्यासाठी उत्तम असतात. म्हणूनच जाहिरातबाजीच्या मागे लागून विदेशी वस्तू वापरण्यापेक्षा स्वदेशी वस्तू वापरणे कधीही चांगलेच. स्वदेशी चळवळीचे एक महान प्रचारक आणि अभ्यासक राजीव दीक्षित यांनी आपले संपूर्ण आयुष्यच त्यासाठी वाहून घेतले होते. स्वदेशी चळवळीला त्यांनी योग आणि आयुर्वेद यांची जोड दिली होती. घरात विशेषतः स्वयंपाकघरात



असणाऱ्या अनेक वस्तूंचा आपल्या आरोग्यप्राप्तीसाठी वापर कसा करून घेता येईल हे त्यांनी अनेक रुग्णांवर प्रयोग करून सप्रमाण सिद्ध केले. घरात असणाऱ्या हळद, दालचिनी, मिरी, लवंग या सारख्या मसाल्याच्या वस्तू तसेच मेथी, खाण्याचा चुना, मीठ यासारख्या अनेक गोष्टींचे अनेक आजारांवर उपयोगी पडणारे गुणधर्म सांगितले. या सगळ्या गोष्टींचा वापर करून आज बाजारात अनेक औषधे आणि सौंदर्यप्रसाधने उपलब्ध आहेत आणि ती आपण घरच्या पदार्थांचा वापर न करता अत्यंत महागड्या किमतीने विकत घेतो. मीठ, साखर, बेकरी पदार्थ, फ्रिज आणि फ्रिजमधील वस्तू यासारख्या गोष्टींच्या अतिवापरापासून दूर राहा असेही राजीव दीक्षित यांनी निक्षून सांगितले. तरी घरात मोठा फ्रिज असणे ही आम्ही प्रतिष्ठेची बाब समजतो. रोज मिळणाऱ्या ताज्या भाज्या आणि तयार झालेले अन्न लगेच खाल्ले तर फ्रिजची फारशी गरज राहणार नाही. आजचे आधुनिक संशोधन सुद्धा ( क्रमशः )

## आनंदी पहाट



# स्वास्थ्यासाठी मन अधिक महत्त्वाचे

आधुनिक केसरी

आजच्या धकधकीच्या जीवनात आपलं मानसिक, शारीरिक स्वास्थ्य हरवत चाललं आहे. मुख्य म्हणजे आपली दिनचर्या योगसाधनेच्या विपरीत झाली आहे. ह्यासाठी आय. टी कंपन्यांचं उदाहरण घेतलं तर लगेच लक्षात येईल. आपल्या देशातील इंजिनिअर, डिझायनर आणि कॉल सेंटरवरील प्रत्येकाला भारतीय वेळेप्रमाणे दिनचर्या न ठेवता परदेशातील वेळेप्रमाणे काम करत असतात. दिवसाच्या सुरवातीपासूनच भारतातील सेवा मिळवण्यासाठी परदेशांतून फोन येतात. ब्रह्ममुहूर्त ही साधनेची उत्तम वेळ आहे, परंतु रात्री उशिरांपर्यंत काम करून झोपायला ज्यांना तीन ते चार वाजतात, त्यांची तर ती मध्यरात्रीची वेळ असते. अशा प्रकारे परदेशातील दिनचर्येशी आपली दिनचर्या जुळत नसल्याने त्याचा थेट परिणाम शारीरिक स्वास्थ्यावर होत राहतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्याला ह्या जगात कोणतीही गोष्ट फुकट मिळत नाही. आपले शरीर मात्र याला अपवाद आहे. कारण ते आपल्याला फुकट मिळालेलं आहे. कदाचित त्यामुळेच शरीराची काळजी न घेता आपण फुकटचं आजारपण ओढवून घेत असतो. आयुष्यात अनेक गोष्टी पुनःपुन्हा मिळू शकतात, परंतू आपलं शरीर मात्र पुन्हा मिळत नाही. म्हणूनच त्या शरीराची काळजी घेणं जरुरीचं असतं. योग ही एक जीवनपद्धती असून, ती पुरातन काळापासून भारतात प्रचलित आहे. योग हा मुळात अध्यात्मिक प्रचितीकरिता केला जातो. योगामुळे मनःशांती तर प्राप्त होतेच, त्याचप्रमाणे शारीरिक, मानसिक स्वास्थ्यसुद्धा लाभते. योगासन, प्राणायाम, ध्यान, सूर्यनमस्कार, श्वसनाचे प्रकार ह्या सर्व प्रक्रिया शरीराच्या माध्यमातूनच कराव्या लागतात. ह्या सर्वांच्या सरावानं मन, शरीर व श्वास ह्या गोष्टी एका लयीत येण्यास मदत होत राहते. शरीर सुस्थितीत असेल तरच योग साधना चांगली होऊ शकते. शरीर हे योग साधनेचं माध्यम असल्याची जाणीव आपण करून घेतली पाहिजे.



आधुनिक केसरी

## झिजावी ही काया | संतां पायी ||

आनंदी सत्वगुण दावी | सन्मार्गाची दिशा ||
रज तम दशा | जीवनाची ||१||
परावाणी शोभे | सात्विकांच्या मुखी ||
दाभिकांच्या मुखी | लोभी भाष्य ||२||
जगाच्या उध्दारा | संत जन्म घेती ||
बोल जे बोलती | कालातीत ||३||
सत्वगुणी खाण | गाथा-ज्ञानेश्वरी ||
ऐसी अमृतेश्वरी | दुजी नाही ||४||
मागणे हे आता | तुज विठुराया ||
झिजावी ही काया | संतां पायी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

यत्र यत्र च गच्छामि स्थानं च तव रेणुके|
अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं
नमाम्यहम्|| ४७||
मी जेथे जेथे जातो, तेथे तुझेच
स्थान असावे. तुला दुर्गा देवीला मी
अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

जो वस्तू जैसा रहे, तैसा वाको जान ।
रुप बोध निर्भ्रान्त है, संशयहिन सज्ञान ।।०३।।
(स्वर्वेद चतुर्थ मण्डल चतुर्थ अध्याय)
०४/०४/०३ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जी वस्तू ज्या स्वरूपात आहे, त्याच स्वरूपात त्या वस्तूला संशयरहित, निर्भ्रांतपणे जाणणे म्हणजेच ज्ञान होय.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

## काव्य-चरितावली



पुष्प ३६ वे

आधुनिक केसरी

डांबेवाडी गावी श्रीमहाराज गेले
भगिनी भीमाबाईला भेटले
बाई,घाल भिक्षा मला लवकरी
मोठ्यने म्हणाले ते घरासमोरी ।।
आवाज ओळखला बहिणीने,म्हणे
गणू,का असे दुःख दिलेस आम्हाला
विसरुनी गेला कसा तू घरादाराला
त्यात भर बैरागी-साधू होऊनी आला ।।
यावरी महाराज तिजला बोलले
जायचे आहे मजला गे,दूर येथुनी
बाई,सांगू नकोस भेटीचे आपल्या
बोलुनी तिजला ते निघाले तेथूनी ।।
सज्जनगडी श्रीसमर्थांचे दर्शन
तेथूनी केले रामेश्वराकडे प्रयाण
येहळेगावी येतांना वाटेत थांबुन
तिरुपती बालाजीचे घेती दर्शन ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# वृत्ति सुधारण्यासाठी नाम घ्यावे

आधुनिक केसरी

नाम हे अत्यंत सूक्ष्म आहे आणि वृत्ति सुद्धा सूक्ष्म आहे. दुसऱ्या कशासाठी नाम न घेता ते वृत्ति सुधारण्यासाठी घ्यावे. वृत्ति सुधारली की चित्त शांत होईल, चित्त शांत झाले की निष्ठा उत्पन्न होईल. सगळ्यांचा भावार्थ एकच आहे. मध्यंतरी योगाचार्य अय्यंगार यांचे एक वचन वाचनात आले, “Meditation does not calm the mind; but a calm mind can meditate.” हे एक प्रकारे ज्ञानयोग आणि ध्यानयोग त्यांनी एकत्र केल्याप्रमाणे आहे. आधी अष्टांग योगाच्या पायऱ्यांनी मन शांत करायचे व मग त्या शांत मनाने ध्यान लागेल. परंतु रोजच्या व्यवहारात हे निश्चित अवघड आहे. गंमत अशी होते की आपण मन शांत करण्याचा ‘प्रयत्न’ करेन असे सद्गुरूंना सांगतो; पण हा ‘प्रयत्नच’ मन शांत होऊ देत नाही. जिथे प्रयत्न गळून पडतो व सपशेल शरणागती पत्करली जाते तिथून पुढे शांतीचे साम्राज्य सुरु होते. या आधीच्या वचनांच्या चिंतनात आपण ‘वृत्ति’ बद्दल बघितले आहेच. श्रीमहाराजांचा आत्यंतिक भर हा वृत्ति सुधारण्यावर आहे हे आपल्याला आता लक्षात आलेच आहे. कारण अध्यात्म हे केवळ आणि केवळ ‘आतले विश्व’ आहे, त्यात बाहेरच्या कोणत्या गोष्टीचा खरे तर संबंधच नाही. पूज्य बाबा बेलसरे म्हणायचे, बाहेरच्या गोष्टीचे महत्त्व तेवढेच जितकी ती गोष्ट आतली वृत्ति सुधारायला मदत करेल. जसा सत्संग... ( तो खरा असला तर ) त्याचा उपयोग वृत्ति सुधारण्यासाठी होतो. परंतु नाम-धारकांना एक अतिशय सोपी गोष्ट अशी आहे की जे नाम त्यांना गुरुकडून मिळालेले आहे, ते नाम दुहेरी काम करते, किंबहुना अनंत-पदरी काम करते म्हटले पाहिजे. एकीकडून सद्गुरू प्रदत्त नामाने चित्तवृत्ति शांत होऊ लागतात, आयुष्यात अविरोध येतो आणि त्याच नामाच्या सततच्या अभ्यासाने सद्गुरूंचे सान्निध्य जाणवल्यामुळे साधकाची वाटचाल हळूहळू एकनिष्ठ भक्त बनण्याकडे होते. मात्र हे होण्यासाठी श्रीमहाराज वरच्या वचनात एक अट घालतात, “दुसऱ्या कशासाठी नाम न घेता ते वृत्ति सुधारण्यासाठी घ्यावे”. ही अट घालण्यामागे सद्गुरूंची आत्यंतिक दूरदृष्टी प्रतीत होते. जो नाम काही कामना मनामध्ये ठेवून जपतो, त्याचा संसार मार्गी लागणार नाही असे नाही. त्याने जी कोणती कामना केलेली असेल ती जर त्याच्या हिताची असेल तर सद्गुरू ती पूर्ण करतीलही; परंतु यामुळे त्याची वृत्ति मात्र कदापि सुधारणार नाही. ती कायम लौकिक जगाच्या जंजाळातच अडकून राहील आणि जे नश्वरच आहे तेच भोगण्यासाठी चौऱ्यांशी लक्ष योनीतून त्याची भटकंती थांबणार नाही! पुन्हा मनुष्य जन्मच मिळेल याची काय शाश्वती ? तुम्ही ज्या कामनेने भरलेले आहात ती कामना ज्या योनीत पूर्ण होईल अशी योनीच प्राप्त होते यासारख्या अनंत गोष्टी आपल्याला उपनिषदे - पुराणातून सापडतात.



## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

प्रपंच आम्हाला कडू वाटला तरच शिष्य होण्यास प्रश्न. साधी बैलगाडी सुद्धा चालविता येणार नाही. आपला देह मनुष्य आपल्या मनाने चालवितो, आणि खड्ड्यामध्ये पडतो. सद्गुरू हे गाडीवानाचे काम करतात आणि आपल्या देहरूपी गाडीला योग्य रस्त्यावरून नेतात. आपण नेहमी भगवंताच्या अनुसंधानात मग्न असावे आणि गाडीवानावर विश्वास ठेवून निर्धास्त असावे, मग कसलाच धोका उरणार नाही; आपल्या नशिबात जेवढे मिळायचे असेल तेवढेच आपल्याला मिळणार, अशी वृत्ती बनून आपले हवेपण कमी होईल.मनाची ही वृत्ती झाली की, जे घडेल ते भगवंताच्या इच्छेनेच घडेल असे आपल्याला वाटू लागेल. असे वाटू लागले की समाधान चालत घरी येईल. पण हे सगळे होण्यासठी आपल्या अंतःकरणाची शुद्धता हा पाया आहे. आणी हा पाया सदगुरूंकडूनच रचला जात असतो .सरकारी नोकर वरिष्ठाच्या हुकुमाप्रमाणे चालत असल्यामुळे त्याच्यावर वैयक्तिक जबाबदारी कसलीही येत नाही आणि कर्तेपणाही त्याला शिवत नाही; क्रमशः



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

यस्य नास्ति स्वयंप्रज्ञा शास्त्रं तस्य करोति किम् ।
लोचनाभ्यां विहीनस्य दर्पणः किं करिष्यति ।।
सरलार्थ - ज्याला स्वयंप्रज्ञा म्हणजे अभिजातबुद्धी नाही त्याला शास्त्राचा काय उपयोग ? दोन्ही डोळयांनी अंध असलेल्या (माणसाला ) आरसा काय कामाचा ?
स्पष्टीकरण - एखाद्या शास्त्राचा जर तळ गाठायचा असेल, तर माणसाला आतली बुद्धी हवी. घोकंपट्टीने शास्त्राचा वरवरचा अर्थ कळेल; पण त्या शास्त्राचे मूळ तत्त्व काय ते मात्र समजणार नाही. जर स्वयंप्रज्ञा असेल तर शास्त्रातल्या विषयांचा वेगळा अर्थ लावून त्याचे प्रतिपादन करता येते.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, २० जुलै २०२३




श्री दत्ता जायभाये: डोंगरचा साक्षेपी संपादक!

पान ६



एकहाती सत्तेपासून शरद पवार वंचित

पान ७

# कृषिप्रधान देशात हळद उत्पादक उपाशी, व्यापारी तुपाशी


आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** भारत हा एकमेव देश आहे की ज्या देशाला कृषीप्रधान देश म्हणून संपूर्ण जगामध्ये विशेष अशी ओळख आहे. आजही आपला कृषिप्रधान देश अन्नधान्य उत्पादनाच्या बाबतीत अव्वल स्थानी अग्रेसर आहे. हळद हे मसाला वर्गीय पिक असून, औषधीयुक्त बहुगुणी असल्याने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत हळदीला विशेष मागणी असते. त्यामुळे आपसुकच हळद उत्पादकांच्या संख्येत कमालीची वाढ झाली आहे. परिणामी राज्यातील वाशिम, हिंगोली, वर्धा, परभणी, सांगली आदी अनेक जिल्ह्यात हळदीचे भरघोस उत्पन्न घेतल्या जाते .परंतु सदर पिकास राज्य व केंद्र शासनाचा कुठलाही हमीभाव नसल्याने ऐन हंगामात बाजारपेठेतील आवक पाहून व्यापाऱ्यांनी ४५०० ते ६५०० रुपये प्रति क्विंटल प्रमाणे मनमानी भावात शेतकऱ्यांची हळद खरेदी केली आहे. आज मितिस ९० टक्के शेतकऱ्यांनी आपली हळद विकून टाकल्यानंतर त्याच हळदीचे भाव १२ हजार ते १५ हजार रुपये प्रति क्विंटल प्रमाणे गगनाला भिडले आहेत. त्याचा एकंदरीत फायदा खरीददार व्यापारी यांनाच होणार असून, आपल्या कृषीप्रधान देशात कष्ट करून घामगाळून उत्पादन करणारा शेतकरी उपाशी आणि व्यापारी तुपाशी हे सत्य वास्तव समोर येत आहे.  हळदीला भारतीय संस्कृतीत एक मानाचे स्थान परंपरागत मिळाले असले, तरी विविध औषधीयुक्त गुण असल्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर हळदीला नेहमीच विशेष मागणी असते. शिवाय योग्य मशागत व सुयोग्य व्यवस्थापन केल्यास हमखास नगद उत्पन्न देणारे पीक म्हणून हळदीच्या पिकाकडे खात्रीने पाहिला जाते. त्यामुळे दिवसागणिक हळद उत्पादक क्षेत्रात कमालीची वाढ होत आहे. परंतु हे वार्षिक पीक असल्याकारणाने याचा उत्पादन खर्च इतर पिकांपेक्षा चौपट आहे. शिवाय मेहनत आणि निगा सुद्धा खूप घ्यावी लागते. त्यामुळे सदर पिकास शासनाकडून किमान १० हजार रुपये प्रति क्विंटल असा हमीभाव मिळावा अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. परंतु व्यापाऱ्या पुढे नतमस्तक झालेलं शासन शेतकऱ्यांच्या मागणीला केराची टोपली दाखवत असल्याची अनेक उदाहरणे सर्वश्रुत आहेत.



शासनाचा हमीभाव नसल्याने माल तोच पण, हिंगोली बाजार समितीत ६८०० रुपये, रिसोड बाजार समितीत ६२०० रुपये तर वाशिम बाजारपेठेत ५५०० रुपये आशा विसंगत भावात खरेदी केल्या जातो. म्हणजेच, आवक पाहून व्यापारी मनमानी भाव ठरवतात व शेतकऱ्यांजवळील माल संपला की अचानक भावात तेजी येते आणि परत तोच माल १२ हजार ते पंधरा हजार रुपये प्रति क्विंटल एवढी उसळी घेतो, हे कशाचे द्योतक आहे.. ? हा गंभीर प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. यावर संबंधित बाजार समितीने अथवा शासनाने जबाब द्यावा अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

**बाजार समितीवर व्यापाऱ्यांचे वर्चस्व** : व्यापारी हा बाजारपेठ व शेतकरी यांच्यातील मुख्य दुवा असून व्यापारी शेतमालाची हवी ती बोली लावून व प्रतवारी करून शेतकऱ्यांची पिळवणूक करतात हे वर्तमानातील वास्तव कुणीही नाकारू शकत नाही . किंबहुना डोळ्यादेखत पिळवणूक होत असलेले शेतकरी सुद्धा . . ! कारण बाजार समितीला व्यापाऱ्यांकडून मलाई मिळत असल्याने त्यांचीच मनमानी चालते . बहुतांश बाजार समितीत्यांवर पदाधिकारी म्हणून रुजू झालेले स्वत : शेतकरी असले तरी, हळदीच्या दराबाबत उदासीन धोरण अवलंबतात हेच शेतकऱ्यांचे दुर्दैव म्हणावे लागेल .





# 'कॅपजेमिनी' कंपनीच्या प्रशिक्षणासाठी छत्रपती शाहू अभियांत्रिकीतील ५५ विद्यार्थ्यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील कांचनवाडी स्थित छत्रपती शाहु महाराज शिक्षण संस्था संचलित छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय म्हणजे शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरण, उत्कृष्ट आणि दर्जेदार प्लेसमेंट, डिजिटल प्लॅटफॉर्म, सर्वोत्तम पायाभूत सुविधा येथे आहेतचं. नुकतेच महाविद्यालयातील ५५ विद्यार्थ्यांची 'कॅपजेमिनी' या नामांकित कंपनीच्या प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली.

'कॅपजेमिनी' या नामांकित कंपनीने प्रशिक्षणाची जबाबदारी पुणे येथील FUEL ( Friends Union for Energising lives ) यांना देण्यात आली. या प्रशिक्षणाअंतर्गत विद्यार्थ्यांना Python, Machine Learning, Core Java, AI, यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण पुणे येथे FUEL ( Friends Union for Energising lives ) यांच्या मार्फत देण्यात आले. तसेच विध्यार्थ्यांना कॅम्पस इंटरव्हुवसाठी प्रत्यक्ष मुलाखतीची तयारी करून घेण्यात आली. सदरील प्रशिक्षण हे नामांकित कंपन्यामधील अनुभवी व तज्ञ प्रशिक्षण मार्फत देण्यात आले. या प्रशिक्षणा दरम्यान विविध कंपन्याचे एच.आर. मॅनेजर आणि  प्रोजेक्ट मॅनेजर यांच्याशी विद्यार्थ्यांचा संवाद साधून देण्यात आला. यादरम्यान राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वातावरणात नोकरी मिळविण्यासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे व त्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःला कसे तयार करावयाचे ? याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सध्याच्या आधुनिक युगात विद्यार्थ्यांना अद्ययावत ज्ञान मिळवून नामांकित कंपनीमधे नोकरी मिळविण्यासाठी स्वतःला तयार करण्याची आवश्यकता आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, उपप्राचार्य डॉ. देवेंद्र भुयार, ट्रेनिंग आणि प्लेसमेंट हेड डॉ. संदीप अभंग, प्रो. संजय कुलकर्णी, डॉ. मनोज मते यांनी विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# शेकाप महिला प्रदेशाध्यक्ष आशाताई शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त धार्मिक कार्यक्रम

## मतदारसंघातील सर्व वारकरी, ग्रामस्थांना कीर्तन सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** कंधार मतदार संघाचे लोकप्रिय कर्तव्यदक्ष आमदार शामसुंदर शिंदे यांच्या सुविद्य पत्नी तथा शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई  शामसुंदर शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त लोहा कंधार मतदार संघात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, दि. 20 जुलै  गुरुवारी शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई शामसुंदर शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या नांदेड येथील  निवासस्थाना वरून आशाताई शिंदे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त  सकाळी ,०७;३० वाजता पासून   नांदेड शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्याला अभिवादन करून नंतर कंधार व लोहा तालुक्यातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्याला अभिवादन करून लोहा  शहराजवळील पार्डी येथील विकी गार्डन येथे सर्व वारकरी, साधुसंतांचा येथोचित सन्मान आमदार श्यामसुंदर शिंदे कुटुंबीयांच्या हस्ते होणार आहे. विकी गार्डन येथे आशाताई शिंदे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त महाराष्ट्राचे प्रसिद्ध कीर्तनकार कीर्तन केसरी ह. भ. प. अक्रूर महाराज साखरे बीड यांचे कीर्तन होणार आहे ,तरी लोहा कंधार मतदारसंघासह नांदेड जिल्ह्यातील सर्व वारकरी, साधुसंत व माता बहिणी व नागरिकांनी शेकापच्या महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा सौ. आशाताई शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित विविध धार्मिक कार्यक्रम व कीर्तन  कार्यक्रमा सह विविध धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन शेकापचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष अवधूत पाटील शिंदे हरबळकर, शेकापचे नांदेड जिल्हा अध्यक्ष बालाजी ईसादकर, शेकापचे जिल्हा सचिव हनुमंत पाटील जाधव डोणवाडेकर यांनी केले.

# थोरातांचा टोला

आधुनिक केसरी

सध्या विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरुन आणि इतर मुद्यांवरुन विरोधी पक्षांकडून सरकारला घेरण्यासाठी प्रयत्न होत आहेत. सरकारच्या प्रस्तावात 25-30 योजनांची नावे आहेत, योजनांना सर्वात सुंदर नावे दिलेली आहेत पण अंमलबजावणी काहीच होत नाही. यात एका योजनेचे नाव आहे 'एक दिवस बळीराजासाठी', पण वास्तविक पाहता एक दिवस बळीराजासाठी व बाकीचे दिवस आमदार फोडण्यासाठी, असा टोला काँग्रेस विधिमंडळाचे गटनेते बाळासाहेब थोरात यांनी लगावला. यावेळी थोरात यांनी सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गंभीर नसल्याचा आरोप त्यांनी केला. विधानसभेत बोलताना बाळासाहेब थोरात यांनी म्हटले की, पावसाळी अधिवेशन सुरु असून सत्ताधारी पक्षाचे मंत्रीच सभागृहात उपस्थित नसतात हे चित्र दिसत आहे. सभागृहाच्या कामकाजाच्या सुरुवातीचा तास प्रश्नोत्तराचा राहील हे सर्वानुमते ठरविले होते. सभागृहाचे सदस्य अत्यंत महत्त्वाच्या आणि गंभीर प्रश्नांना वाचा फोडत असतात. पण मंत्री मात्र या प्रश्नांना गांभीर्याने घेत नाहीत असं दिसत असल्याचे थोरात यांनी म्हटले. मंत्री सभागृहात येताना कोणतीही तयारी करून येत नाहीत, माहिती घेऊन येत नाहीत. कोणताही मंत्री समाधानकारक उत्तर देत नाही. प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी वारंवार उपमुख्यमंत्र्यांना उभे राहावे लागते हे सभागृहाला शोभत नाही. विधानसभा अध्यक्षांनी मंत्र्यांना सक्त ताकीद द्यावी आणि विनातयारी सभागृहात येऊ नये अशा सूचना कराव्यात, असे काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यांनी ठणकावले. विधानसभेतील सर्वात ज्येष्ठ सदस्यांपैकी एक असलेले बाळासाहेब थोरात आज सभागृहात आक्रमक झाले होते. मंत्री गांभीर्यपूर्वक प्रश्नांचा अभ्यास करत नाहीत असा संताप थोरात यांनी व्यक्त केला. सत्तारुढ पक्षाचा 293 अन्वये शेतीसंदर्भातील प्रस्ताव आहे. राज्यात शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे, शेतीवर आधारीत अर्थव्यवस्था आहे, शेती चांगली झाली तर अर्थव्यवस्थाही व्यवस्थित चालेल. पण एवढा महत्वाचा विषय असताना मंत्री सभागृहात दिसत नाहीत. जलसंपदा मंत्री, जलसंधारण मंत्री, उर्जा मंत्री, दुग्धविकास मंत्री असे दहा विषय या प्रस्तावात आहेत, त्यातील काही मंत्री सभागृहात आहेत तर बाकीचे बाहेर, मंत्री सभागृहाला गांभिर्याने घेत नाहीत हे बरोबर नाही, असेही त्यांनी म्हटले. युतीच्या सरकारमध्ये कृषी विभागाकडे गांभिर्याने पाहिले जात नाही. 2014 ते 2019 या पाच वर्षात चार कृषी मंत्री झाले आणि आता एका वर्षात दुसरा कृषी मंत्री आहे. शेतीसाठी खरिप हंगाम अत्यंत महत्वाचा असतो, खरिपातच रब्बीचे नियोजन होत असते. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना ते स्वतः शेती विषयात लक्ष घालत, विभागवार शेतीसंदर्भात बैठका घेत आणि या बैठकीत सर्व मंत्री, कलगुरु, अधिकारी वर्ग, आमदार, खासदार यांच्याशी चर्चा केली जायची. शेतीच्या क्षेत्रात, ग्रामीण भागात कोणते प्रश्न महत्वाचे आहेत हे समजायचे व विषयाचा प्राधान्यक्रम ठरवला जात असे. ग्रामीण भागातील प्रश्नांना महत्व देऊन त्याला गती मिळत असे. एक दिवस खरिपाच्या विषयावर सर्वंकष चर्चा होत असे, ही परंपरा आम्ही चालू ठेवली.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# नव्या अंतराळ क्रांतीला सुरुवात !

आधुनिक केसरी

**जागतिक अंतराळ प्रवासाच्या इतिहासात, पहिल्या मनुष्याने चंद्राच्या पृष्ठभागावर पाऊल ठेवल्यानंतर आणि भारताने मंगळावर विजय मिळवल्यानंतर कोणत्याही अंतराळ कार्यक्रमाने अधिक वैश्विक कुतूहल निर्माण केले नाही, जितके 14 जुलै रोजी चांद्रयान-3 च्या प्रक्षेपणाने केले. चांद्रयान-३ च्या यशस्वी प्रक्षेपणानंतर संपूर्ण जगाच्या नजरा भारताकडे लागल्या आहेत. जगात क्वचितच असे कोणतेही माहितीचे माध्यम असेल, ज्याने या घटनेची बातमी दिली नसेल. शिवाय, चीनचे अधिकृत वृत्तपत्र 'ग्लोबल टाईम्स'नेही भारताच्या या यशाबद्दल अभिनंदन केले असून या यशस्वी पावलाचे कौतुक केले आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि स्पेननेही चांद्रयान-३ वर लक्ष ठेवण्यास सुरुवात केल्याची बातमी आहे.**

चंद्र हा मानवी जीवनासाठी नेहमीच एक रहस्यमय खगोलीय पिंड राहिला आहे.पृथ्वी हा जिवंत ग्रह आहे आणि चंद्र त्याचा निर्जीव ग्रह आहे. हे गूढ कधी कधी खटकते. चंद्र, पृथ्वी मातेचा भाऊ - आपण भारतीयांनी त्याला हजारो वर्षांपासून 'चंदा मामा' , 'चांदोबा' मानले आहे. चंद्राशी इतका भावनिक संबंध भारतीय संस्कृतीशिवाय क्वचितच इतर कोणाचा असेल. अपोलो-11 नंतर जगातील अनेक देशांनी आपल्या अंतराळ मोहिमेला सुरुवात केली होती. भारत देखील स्पेस क्लबचा एक प्रतिष्ठित सदस्य आहे. 1969 मध्ये, नासाने अपोलो-11 मोहिमेद्वारे अंतराळात मानवाला चंद्राच्या पृष्ठभागावर उतरवून अंतराळ कार्यक्रमात सर्वात लांब झेप घेतली.चंद्राची धूळ माणसाच्या पायाला लागली, त्याला आता अर्धशतक उलटून गेले. दरम्यान, विविध अवकाश कार्यक्रमांनी विश्वाची अनेक रहस्ये उघडली आहेत. भारताच्या चांद्रयान-१ ने प्रथमच चंद्रावर पाण्याचा शोध लावला.

त्यानंतर चांद्रयान-2 ( जे अपेक्षेप्रमाणे यशस्वी झाले नाही ) नंतर चंद्र पुन्हा अवकाश कार्यक्रमांचे आकर्षण बनला आहे.चांद्रयान-3 चे जगभर कुतूहल सुरू असतानाच अमेरिकेच्या नासाने आणि प्रक्षेपणाच्या दोन दिवस आधी, चीनच्या राष्ट्रीय अंतराळ प्रशासनाने चंद्रावर मानव पाठविण्याची घोषणा केली आहे.'मून मिशन'द्वारे आतापर्यंत केवळ काही मोजक्या देशांनी चंद्रावर आपली याने उतरवली आहेत. यापैकी पहिला देश सोव्हिएत युनियन ( आजचा रशिया ) होता, ज्याने 1959 मध्ये पहिली लुना मोहीम सुरू केली. सोव्हिएत युनियनचे लुना-2 हे पहिले यान चंद्राच्या पृष्ठभागावर उतरले होते. यानंतर सोव्हिएत युनियनच्या चंद्राच्या पृष्ठभागावर उतरलेल्या अनेक मोहिमा यशस्वी झाल्या.

युनायटेड स्टेट्स ( अमेरिका )ने 1961 मध्ये आपली अपोलो मोहीम सुरू केली. या मोहिमेद्वारे, अमेरिकन अंतराळवीरांनी चंद्राभोवती प्रवास केला आणि 1969 मध्ये नील आर्मस्ट्राँगने अपोलो-11 मोहिमेचा भाग बनून चंद्राच्या पृष्ठभागावर पाहिले पाऊल टाकले, ही मानवजातीसाठी एक मोठी झेप होती. भारताने 2008 मध्ये चांद्रयान-1 मोहीम सुरू केली, ज्याचा उद्देश चंद्राच्या पृष्ठभागाचा नकाशा बनवणे होता. त्यानंतर २०१९ मध्ये चांद्रयान-२ च्या माध्यमातून लँडर विक्रमला चंद्राच्या पृष्ठभागावर उतरवण्याचा प्रयत्न करण्यात आला, पण तो पृष्ठभागावर पोहोचण्यापूर्वीच अयशस्वी झाला. चीनने 2007 मध्ये चांगई-1 लाँच केले. त्याने चंद्राच्या पृष्ठभागाचे मॅप केले आणि तेथून काही नमुने पृथ्वीवर आणले. इस्रायलने 2019 मध्ये आपली पहिली चंद्र मोहीम 'बरेशिट' लाँच केली, परंतु चंद्रावर उतरताना ती अयशस्वी झाली.


भारताची चांद्रयान-1 मोहीम मानवासाठी महत्त्वाची होती कारण या मोहिमेने प्रथमच चंद्रावर पाण्याची उपलब्धी दर्शविली होती. यापूर्वी, नासाच्या अपोलो आणि सोव्हिएत युनियनच्या लुना मिशनने चंद्रावर पाण्याच्या अस्तित्वाचे कोणतेही संकेत दिले नव्हते. चंद्रावर पाण्याचे अस्तित्व हा खरे तर भारताचा शोध आहे, जो त्याने पहिल्याच प्रयत्नात शोधून काढला. 2019 मध्ये भारताने प्रक्षेपित केलेल्या चांद्रयान-2 मोहिमेमध्ये चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरवण्याचा प्रयत्न होता. त्यात एक अवकाशयान, एल्व्हिएटर ( लँडर ) आणि रोव्हर ( चालणारे रोबोटिक प्रवासी वाहन ) यांचा समावेश होता. चांद्रयान-2 चंद्राच्या पृष्ठभागावर यशस्वीरित्या उतरले नसले तरी चंद्राच्या इतर काही भागांना स्पर्श करण्यात ते यशस्वी झाले. नवीन डेटा आणि वैज्ञानिक माहिती उघड करण्यात मिशन महत्त्वपूर्ण होते, या माध्यमातून आम्हाला चंद्राच्या वातावरणाबद्दल आणि ऐतिहासिक विकासाबद्दल काही माहिती आणि ज्ञान मिळाले.



भारताची सध्याची चांद्रयान-3 मोहीम देखील वातावरणाच्या अभ्यासासाठी आहे आणि चंद्राच्या दक्षिण ध्रुवीय प्रदेशाला स्पर्श करणे आणि तेथून आणलेल्या नमुन्यांचे विश्लेषण करणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट आहे आणि तसे करण्याचा हा जगातील पहिला अंतराळ प्रवास असेल. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर चांद्रयान-3 चे 'सॉफ्ट लँडिंग' 23 ऑगस्ट रोजी यशस्वीरित्या पूर्ण झाले, तर भारत अंतराळ क्षेत्रात नवीन क्रांतीचा शिल्पकार असेल. त्याच्या यशामुळे आणि जीवनविकासाच्या अपेक्षेनुसार माहिती मिळाली, तर भविष्यात भारत चंद्राच्या कुशीत स्थायिक होण्यासाठी पृथ्वीवरील लोकांसाठी बांधकामाचे नवे दरवाजे उघडेल अशी अपेक्षाही करता येईल. आणि हे अनेकांचे स्वप्न आहे.चांद्रयान-3 मोहिमेसोबतच, भारताचे अंतराळ शास्त्रज्ञ एक वेगळे मिशन विकसित करत आहेत, प्रस्तावित बीयारी ( BIYARI ) ( बायोग्राफिकल एक्सप्लोरेशन लॅबोरेटरी इन्स्ट्रुमेंटेशन ), जिज्ञासूच्या सहकार्याने, जे चंद्रावरील जीवनाच्या शक्यतांचा शोध घेईल. या मोहिमेद्वारे, शास्त्रज्ञांना चंद्राच्या वातावरणाचा अभ्यास करण्यासाठी तपशीलवार आणि उच्च-गुणवत्तेच्या वस्तूंचा संग्रह करता येईल.

चांद्रयान मोहिमेद्वारे आतापर्यंत कोणतेही अस्सल जीवन संकेत सापडले नसले तरी ही मोहिम अखिल मानवजातीसाठी महत्त्वाची पायरी आहेत. चांद्रयान मोहिमेसमोर अनेक आव्हाने आहेत, जसे की वातावरणातील इंजिनची क्षमता, चंद्राचे असह्य तापमान, गुरुत्वाकर्षणाच्या अभावामुळे उड्डाण करण्याची आव्हाने इ. अशा मोहिमांमुळे आम्हाला नवीन तंत्रज्ञान शोधता येते आणि चंद्राच्या पृष्ठभागावरील आणि त्याखालील रचना आणि वातावरणाची माहिती मिळवता येते. इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन ( इसरो ) आणि इतर वैज्ञानिक संस्था सतत अशा चांद्र मोहिमेचा विकास करत आहेत, ज्यामुळे आपल्याला चंद्राच्या पृष्ठभागावरील पाणी, वातावरण आणि जीवनाच्या शक्यतांबद्दल अधिक माहिती मिळेल. या मोहिमा आपल्याला मानवी जीवनासाठी कायमस्वरूपी निवासस्थानाच्या शक्यतांबद्दल आणि चंद्राच्या परस्परसंवाद आणि अन्वेषणाच्या पलीकडे जाण्यासाठी साधनांच्या विकासाबद्दल ज्ञान देतील. चंद्राचा शोध भारताचा फोकस बनत आहे आणि याद्वारे आपण अंतराळ संशोधनाच्या नवीन आयामांची अपेक्षा करू शकू.

भारताने आपल्या सभ्यतेच्या उत्कर्षाच्या काळात विश्वाला एक खुले पुस्तक बनवून मानवतेला जे ज्ञान दिले, त्याला तोड नाही हे एक शाश्वत सत्य आहे! संपूर्ण विश्वाचे ज्ञान आणि विज्ञान हा भारतीय शाश्वत संस्कृतीचा अमूल्य वारसा आहे. चंद्राचा सखोल शोध आणि अवकाशातील इतर पैलू भारतासाठी सांस्कृतिक पुनर्जागरण ठरतील. आता आपण केवळ आपले उद्दिष्टच नाही तर आपला विषयच बनवायला हवा. काय सांगावे! उद्या एके दिवशी कदाचित आपला 'चांदोबा' या जगाला एक 'नवीन जग' भेट देईल!




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

# बहुविध प्रतिभेचे धनी डॉ. जयंत नारळीकर

आधुनिक केसरी

**जगप्रसिद्ध खगोल - भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण डॉ जयंत नारळीकर यांचा आज ८५ वा वाढदिवस. १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली.**

त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञानकथेसारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञानासारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रचचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ ( महाराष्ट्र ) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत )आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 ( Maharashtra ) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar ( Maharashtra ) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * ( * According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court. ) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# लोह्यात सकल मराठा समाज बांधवांनी पुकारलेल्या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने दि. १९ जुलै रोजी लोहा बंदची हाक दिली. लोहा बंद च्या हाकेला शहरातील व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन आपली दुकाने, हॉटेल, प्रतिष्ठाने बंद ठेऊन लोहा शहरात १०० टक्के कडकडीत बंद पाळण्यात आला.

लोहा येथे सकल मराठा समाज आयोजित मराठा आरक्षण व गेली दोन आठवड्यापासून मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर दत्ता पाटील हडसनिकर केलेल्या उपोषणाला पाठिंबा म्हणून आज दि.( १९ )जुलै २०२३रोजी शासकीय कार्यालये, बैंका, मेडिकल वगळता शाळा, महाविद्यालये, खासगी शिकवणी, शहरातील व्यापाऱ्यांनी, मुनीमांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन आपली दुकाने, हॉटेल, प्रतिष्ठाने बंद ठेऊन लोहा शहरात १०० टक्के कडकडीत बंद पाळण्यात आला. यावेळी लोहा शहर व तालुक्यातील समाज बांधव, उपस्थित होते.लोहा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुभाष उन्हाळे यांनी विविध ठिकाणी पोलिस बंदोबस्तही तैनात केला होता.

# पुजारीटोला धरण ओव्हरफ्लो

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** जिल्ह्यात मंगळवारी ( 18 जुलै ) दिवसभराच्या विश्रांतीनंतर रात्री मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे गोंदिया जिल्ह्यातील धरण साठ्यामध्ये वाढ झाली आहे. त्यापैकी पुजारीटोला धरण हा रात्रीच्या पावसाने भरलं असून या धरणाचे 4 वक्रद्वार ( गेट ) उघडण्यात आले आहेत. त्यामधून 2998 क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरु आहे. तर कालीसरार धरणाचे 2 गेट उघडले असून त्यामधून 1743 क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरु आहे. धरणातून पाणी सोडल्याने बाघ नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तीन दिवसांपूर्वीच आमगाव आणि सालेकसा तालुक्याच्या सीमेवर असलेल्या पुजारीटोला धरणाचे 8 दरवाजे एक फूट उंचीने उघडण्यात आले होते आणि त्यातून 6021 क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात येत होता. यंदा गोंदिया जिल्ह्यात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. गतवर्षीच्या तुलनेत धरणांतील पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. जिल्ह्यातील मोठी धरण, मध्यम व लघु प्रकल्पासह तलावातील पाणीसाठ्यातही मोठी वाढ झाली आहे. मुसळधार पाऊस होत असल्याने धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याची वाढ होत आहे. यंदाच्या परतीच्या पावसामुळे उन्हाळ्यात गोंदिया जिल्ह्यातील धरणातील पाणीसाठ्यावर अपेक्षित असा परिणाम जाणवला नाही.

# अंधश्रद्धेतून भुताळा ठरवत बहिष्कृत दांपत्याची अंनिसने केली सुटका

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** भारत २१ व्या शतकात असला तरी ग्रामीण भागात आजही अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणावर आहे. सरकारने अंधश्रद्धा किंवा सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा आणला असला तरी समाजात फारसा बदल झालेला नाही. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील कळमुस्ते गावात एक दाम्पत्याला करणी करतात असा आरोप करत समाजातुन अघोषित बहिष्कृत करण्याचा प्रकार अंधश्रद्धा निर्मूलन समितीला कळताच त्यांनी पोलीसांसह कळमुस्ते गावात धाव घेतली. त्या दाम्पत्याच्या घरी भात खाऊन नागरिकांचे प्रबोधन करून गैरसमज दूर केला.

कळमुस्ते या आदिवासी खेड्यातील भीमा बारकू तेलवडे व त्यांच्या पत्नी भागीबाई भीमा तेलवडे या वृद्ध दांपत्याला त्यांच्या भावकीतील काही व्यक्तींनी अंधश्रद्धेतून भूताळा - डाकीण ठरवल्याची तक्रार महाराष्ट्र अंनिसच्या नाशिक जिल्हा शाखेकडे प्राप्त झाली होती. अंनिसने पोलीस अधीक्षकांना भेटून संबंधितांवर जादूटोणाविरोधी कायद्याचे कलम लावण्याची मागणी केली असता संबंधितांवर गुन्हा दाखल झाला. मात्र याचा उलट परिणाम होऊन तेलवडे कुटुंबीयांचा त्रास वाढला तसेच त्यांच्यावर बहिष्कारही सुरूच होता. त्यामुळे मंगळवार दिनांक १८ जुलै २०२३ रोजी हरसूल पोलीस स्टेशनचे स.पो. नि गणेश म्हस्के व त्यांचे पथक, महाराष्ट्र अंनिसचे राज्य प्रधान सचिव डॉ.टी. आर.गोराणे, राज्य सदस्य प्रल्हाद मिस्त्री, नाशिक जिल्हा कार्याध्यक्ष डॉ.श्यामसुंदर झळके, त्र्यंबकेश्वर शाखेचे कार्याध्यक्ष संजय हरळे, नाशिक शहर शाखेच्या कार्यकर्त्या विजया गोराणे हे सर्व कळमुस्ते (हरसूल) ह्या आदिवासी गावात पोहोचले. त्यांनी पीडित कुटुंब आणि सामनेवाले यांना सरपंच हिरामण चावरे,पो.पा. चिंतामण शिंदे यांच्या उपस्थितीत समोरासमोर आणून दोन्ही बाजूंकडील म्हणणे ऐकून घेतले. महाराष्ट्र अंनिसच्या कार्यकर्त्यांनी डाकिण, भूताळीण या अनिष्ट, अघोरी प्रथेबद्दल डॉ.गोराणे यांनी काही चमत्कार प्रात्यक्षिके सादर करून लोकांचे प्रबोधन केले. हवालदार एस.के.ठाकरे, एच.पी. गवळी, पोलिस नाईक आर.बी.गवळी यांनी जादूटोणा विरोधी कायदा व सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा याबाबत सविस्तर माहिती दिली. डॉ.गोराणे यांनी पीडित कुटुंबाच्या घरातील भात मागवून सर्वांसमोर सेवन केला. पिडीत कुटुंब जादूटोणा, करणी, भानामती करते तर आम्हालाही त्यांच्या घरातील अन्न सेवन केल्याने त्रास होईल तरी आम्ही ते स्वेच्छेने सेवन करीत आहोत. मात्र अशा प्रकारचा जादूटोणा, मंत्र, तंत्र, करणी, भानामती असे काही नसते, तेव्हा आपणही अशा अवैज्ञानिक, कालबाह्य गोष्टींवर विश्वास ठेवू नये असे सांगत उपस्थितांना भात खाण्याचे आवाहन केले. त्यानंतर पोलिसांनी आणि काही नागरिकांनी कार्यकर्त्यांसमवेत भात सेवन केला त्यामुळे वातावरण अतिशय हलके फुलके झाले. नंतर पीडित कुटुंब आणि सामनेवाले यांना समोरासमोर आणून एकमेकाला साखर भरवण्याची कार्यकर्त्यांनी विनंती केली. त्यांनी एकमेकांना साखर भरवत आनंद व्यक्त केला.



पीडित कुटुंबियांची अंनिस कार्यकर्त्यांनी भेट घेतली होती . त्यांना घेऊन नाशिकच्या पोलीस अधीक्षक यांच्याशी चर्चा केली होती . पिडीतांना त्रास होत असल्याने कार्यकर्त्यांनी संबंधितांचे प्रबोधन करून त्यांच्यातील कटुता मिटवली . **डॉ .टी .आर .गोराणे,राज्य प्रधान सचिव,अंनिस**




महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

अर्जंट पाहिजेत
बँक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वत:ची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958

CAFÉ ROCKSTARZ EAT. CHILL. REPEAT
11:11 ELEVEN ELEVEN
Where Dishes come True..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# मनाचे व्यवस्थापन : एक शास्त्रीय दृष्टिकोन



डॉ. विलास इप्पर
संपर्क क्र.: 9322185214

आधुनिक केसरी

**'मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण', असे समर्थ रामदास स्वामी म्हणतात. अर्थात मन ,बुद्धी आणि अहंकार हे तीन तत्त्व सूक्ष्म शरीराच्या संबंधित आहेत याचा आपण याही पूर्वी उल्लेख केलाच होता. तर या लेखात आपण इंद्रियाच महत्व, मनाच महत्व, मनाचं योग्य व्यवस्थापन (Mind Management) आणि मनाच्या व्यवस्थापनाच्या माध्यमातून इंद्रियांचे नियमन करून, आपला व्यक्तिमत्व विकास कसा करता येईल? यासंदर्भात चर्चा करणार आहोत. इंद्रिय, इंद्रियांचे विषय, मन, बुद्धी, आत्मा, आणि सर्वांना संचलित करणारी अद्दश्य शक्ती असा हा क्रम आहे. विषय हे सर्वात कनिष्ठ तर इंद्रिय इथ श्रेष्ठ ठरतात.**

उदा. विषयाच्या आहारी जाणे, जसे की व्यसनी माणूस, विषय लंपट व्यक्ती, पैशाचा लोभ किंवा वाम मार्गाने,भ्रष्टाचारी मार्गाने, पैसा कमविणे, हे सर्व विषय आहेत. जिभेचे लाड पुरविणे हाही विषय झाला. थोडक्यात इंद्रियांचे उद्दातिकरण केले जाते पण असे उद्दातिकरण योग्य पध्दतीने करण्यासाठी मनाचं योग्य व्यवस्थापन करता आले पाहिजे. इंद्रियपेक्षा 'मन' श्रेष्ठ आहे परंतु मन हे माशीसारखे असते. माशी ही मिष्ठांनावरही बसते आणि उकिरड्यावरही बसते. तसेच आहे मनाचे. त्यामुळे मनाचं योग्य व्यवस्थापन ( उदात्तीकरण ) करता आले पाहिजे. मन ठिकाणावर नसेल तर एखादा सद्गृहस्थ जवळून गेला तरी कळत नाही. मन थाऱ्यावर नसेल तर अन्नाची चव देखील कळणार नाही. थोडक्यात मनाचे योग्य नियमन झालं पाहिजे.

उपनिषदामध्ये खास करून 'कठोपनिषद' यामध्ये मन, बुद्धी आणि अहंकार या तीन तत्त्वाचं वर्णन अत्यंत चांगल्या पद्धतीने करण्यात आलेल आहे. यामध्ये इंद्रियाचा प्रथक भाव लक्षात घेऊन त्याचं योग्य व्यवस्थापन आणि नियमन करता येते. आपण नेहमी म्हणतो 'कळते पण वळत नाही' हे वळणे म्हणजेच मनाचं व्यवस्थापन होय.

मानाचं शास्त्र अनेक विद्वानांनी सांगितले आहे. इथे आपण मनाच्या नियमनासाठी, संचालनासाठी करावयाचा अभ्यास इथ करणार आहोत.

मन, बुद्धी आणि अहंकार हे जे घटक आहेत ते इंद्रियाच कस नियमन करतात आणि त्यानुसार व्यक्तीचा आध्यात्मिक विकास कसा होतो ? याचा विचार इथ करण्याचा प्रयत्न केला आहे.

विषय हे इंद्रियापेक्षा कनिष्ठ आहेत परंतु इंद्रियापेक्षा मन हे श्रेष्ठ आहे. म्हणजे मन हे इंद्रियाचं नियमन करत असते. परंतु मनाच्याही पेक्षा 'बुद्धी' श्रेष्ठ आहे, कारण बुद्धीच्या विचाराने मन चालते आणि मनाच्या लहरीप्रमाणे इंद्रिय निर्णय घेण्यास कारणीभूत ठरतात. तर येथे बुद्धी हा घटक महत्त्वाचा वाटतो. बुद्धीही पेक्षा 'आत्मा' श्रेष्ठ आहे अस या शास्त्रामध्ये वर्णन आलेल आहे. तर इथ आत्मा ही काल्पनिक शक्ती वाटत असली तरी सर्वसामान्यपणे आत्मा ही संकल्पना आपल्याला परिचित आहेच. ही अशी सर्व श्रृंखला आहे. आत्मा, बुद्धी,मन इंद्रियाचे विषय. या सर्वांना जी शक्ती संचलित करते जी अव्यक्त स्वरूपामध्ये आहे आणि आत्म्याहीपेक्षा ती श्रेष्ठ आहे, जी अदृश्य शक्ती इथे श्रेष्ठ ठरते. आपण त्याला खास करून अध्यात्मामध्ये ईश्वरी शक्ती असं संबोधतो. जी आपल्या मनाला संचलित करण्यासाठी, नियंत्रित करण्यासाठी, निर्देशित करण्यासाठी ,अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडते. या शास्त्राचा व्यवस्थितपणे अभ्यास आपण मनाच्या नियमनासाठी कसा करता येऊ शकतो ? याचा इथे विचार करत आहोत. मन हे श्रेष्ठ आहे, परंतु मनाला नियंत्रित करण्याच काम बुद्धी करते आणि बुद्धीच वैभव किंवा बुद्धीची शक्ती वाढविण्याच काम आत्मपरीक्षणाद्वारे थोडक्यात अध्यात्माद्वारे करता येऊ शकतं, आणि अशा अध्यात्मामध्ये अदृश्य अशा किंवा सर्वव्यापी अशा ईश्वरी शक्तीने करणे ते अगत्याचे आहे.

स्थूल शरीर असो किंवा सूक्ष्म शरीर असो या शरीराचा व्यवस्थितरित्या अभ्यास आणि निरीक्षण हे आध्यात्मिक अभ्यासाचे विषय आहेत. नाक ,डोळे, कान, जनन इंद्रिय हे जे इंद्रिय आपण प्रत्यक्षपने बघतो त्याचा अनुभव आपण घेतो/ आनंद घेतो आणि तो आनंद घेण्याच मन हे संचलन करते आणि याच मनाला बुद्धी निर्णय घेण्यासाठी मदत करते. म्हणून आपण अशा या इंद्रियाच महत्त्व प्रथक भाव समजून घेऊन, आपल्याला आपल्या जीवनाचा विकास करता येतो. याला आपण इंद्रियाचा प्रथम भाव असे म्हणू शकतो. भाव म्हणजे एक एक गोष्ट समजून घेण्याचा केलेला प्रयत्न. तर आपल्या जीवनामध्ये, निसर्गामध्ये आजूबाजूला कोणकोणते तत्वे आहेत ? त्यांचा काय उपयोग आहे ? हे सर्व आपण म्हणजे, जीवाने समजून घ्यायला हवे आणि ह्याच जीवाच अत्यंत महत्त्वाच तत्व म्हणजे मन आहे. आपल्याला ते मन ओळखायला आले पाहिजे. अध्यात्मात मनाला ओळखता आले तर त्याचे नियमन करता येते. उदाहरणार्थ एखाद्या होमिओपॅथिक डॉक्टरकडे आपण एखादा रोग घेऊन गेलो तर डॉक्टर आपल्याला अनेक प्रश्न विचारतो. त्या प्रश्नाची म्हणजे शरीरातील असलेल्या रोगाविषयीच्या प्रश्नाची उत्तरे मिळाली की होमिओपॅथिक औषध लागू पडते.

अशा प्रकारे मनाला ओळखता आले तर त्या मनाचे योग्य नियमन करता येते आणि हेच आपल्याला शास्त्रामध्ये सांगितलेल आहे. म्हणून विषयापेक्षा इंद्रिय श्रेष्ठ आहेत म्हणजे विषय हे इंद्रियाचे तत्व आहे म्हणून विषयापेक्षा इंद्रिय श्रेष्ठ आहेत इंद्रियापेक्षा मन श्रेष्ठ आहे मनापेक्षा बुद्धी श्रेष्ठ आहे आणि बुद्धीपेक्षा आत्मा श्रेष्ठ आहे आणि त्याहीपेक्षा अव्यक्त असे तत्व असेही प्रश्न उत्तराची शृंखला समजली की आपल्याला मनाचा अभ्यास होतो. विषय आणि विषयी हे दोन स्वतंत्र तत्त्वे आहेत. विषय हा सब्जेक्ट व त्याच क्षणी विषयी हा ऑब्जेक्ट आहे म्हणून हे विषय या पद्धतीने शास्त्रशुद्ध पद्धतीने समजून घेतल तर आपल्याला मनाचाही अभ्यास होतो. आपण ज्यावेळी झोपतो त्यावेळी झोपेत विश्व नसते परंतु उठला रे उठलो की तात्काळ विश्व किंवा जगत दिसते. म्हणजे मी विश्वापेक्षा श्रेष्ठ आहे. जगत व विषय चांगले वाटतात याचे कारण काय ? कारण जग सुंदरच आहे! जगाला वाईट समजण्याचे कारण नाही, असा हा भाव बौद्धिक शक्तीने आपल्याला समजून घेता येतो. परंतु भावनात्मक दृष्टीने जग खोटे ठरते ( जगत मिथ्या ) परंतु याचा अर्थ असा नव्हे की जग वाईट आहे .उलट जग खूप चांगले आहे. जग चांगले वाटण्याचे कारण जागरूक इंद्रिय, जगाचा रस आत्म्याला देतात. मी अर्थात 'मी' हे तत्व स्वतंत्र आहे व विश्वही स्वतंत्र आहे पण विश्वाचा व माझा संबंध जोडणारी इंद्रिय आहेत म्हणून इंद्रिय चांगली आहेत आणि इंद्रियाच्या मदतीने आपण 'हरी' जवळ किंवा ईश्वरा जवळ जातो. ज्याला आपण हरिद्वार म्हणूयात म्हणजे इंद्रिय किती महत्वाची आहेत जे यावरून सिद्ध होते. इंद्रियाचे पूजन झाले पाहिजे, म्हणजे काय कुणी म्हणेल आम्ही इंद्रियाचे पूजन करतोच, इंद्रियांना जे हवे ते देतच असतो, परंतु हे इंद्रियाचे पूजन नव्हे, इंद्रियांना जे योग्य आहे ते देणे हे पूजन होय. जगात सुंदर सुंदर रस आहेत. निसर्गाचे सौंदर्य आहे .धनुष्य, इंद्रधनुष्य आहे असं हे तत्वज्ञान इंद्रियाच्या संबंधित समजून घेतलं, तर आपल्याला मनाचं संचलन आणि नियंत्रण करणे सोपे जाईल. अहंकार बाळगू नका किंवा अहम समजून घ्या, असं शास्त्रामध्ये सांगितलेलं आहे. अर्थात या संकल्पनेचा फायदा घ्यायचा असेल तर इंद्रियांना योग्य वळण लावण्यासाठी, कर्मयोग आपल्याला मदत करतो असा हा कर्मयोग आहे. यामध्ये इंद्रियाचे



उद्दतीकरण कसे केले जाऊ शकते याचं मार्गदर्शन आपल्याला मिळून जातं. याचे नेमकं कारण काय तर त्या इंद्रियांना योग्य असे कार्याला लावून आपण आपल्या जीवनाचा उत्कर्ष करून घेणे होय. धर्मराज असे सांगत नाहीत की मी खोटे बोलत नाही .धर्मराज सांगतो की माझी वाणी खोटे बोलतच नाही अशा प्रकारे आपण इतकी शक्ती संपादन करायला हवी की ज्यामुळे आपण सांगू शकू की माझे डोळे उलटे-सुलटे काही पाहणारच नाहीत. माझे मन उलट सुलट विचार करणारच नाही, याप्रमाणे जगामध्ये अत्यंत महत्त्वाचं तत्व. महापुरुष स्वतःच्या मनाला अशा प्रकारची शिकवण देऊन तयार करतात. जसे की वाणीचे व दृष्टीचे उद्दातीकरण करणे होय. प्रथम मी, जगत व ईश्वर हे महत्त्वाचे तीन तत्त्वे आहेत. त्यातील ईश्वर दिसत नाही. उरली दोन. मी आणि जगत. जगत व मी यांना जोडणारा पूल म्हणजे इंद्रिय. म्हणून इंद्रियाचे उद्दतीकरण नियमन करणे महत्वाचे. नेत्रात भगवंताला पहा. नेत्रात भगवान आला की सर्व ठिकाणी भगवान दिसू लागतो. डोळे ही मोठी शक्ती आहे म्हणून डोळे तेजस्वी, मृदू , प्रेमळ व भाववाही राहतील असा प्रयत्न करायला हवा, अशी भगवतमय दृष्टी झाली तरच संपूर्ण सृष्टीत भगवंत दिसायला लागतो. आपल्या आई -बाबाकडे आपण उपयुक्ततेच्या दृष्टीने पहायचे व त्यांना नमस्कार करायचा हे योग्य नाही. जगातली प्रत्येक वस्तू आपल्याला विचारते की माझ्याकडे कोणत्या दृष्टीने पाहतोस ? भोगाने, भावाने का भक्तीने ? ज्या दृष्टीने आपण प्रत्येक वस्तूकडे पाहत असतो त्यावरून आपण कोणत्या संस्कृतीचे आहोत हे ठरते. त्याचप्रमाणे दुसरा अवयव किंवा इंद्रिय म्हणजे कान ही एक मोठी शक्ती आहे. कानाचं उद्धातीकरण करा म्हणजे कानाला दिव्य करा म्हणजे कानाने दिव्य श्रवण करा. आजन्म दिव्य श्रवण करीत राहिलो तर एखाद्या जन्मात भगवान म्हणेल की तू माझा आहेस, हे ऐकण्यासाठी चार जन्म घेण्याची तयारी हवी. म्हणून आपण भगवंताला सांगायला हवे की प्रभू मला जन्म दे. तेव्हा एखाद्या जन्मात भगवान म्हणेल तू माझा आहेस. हे श्रवण इंद्रियाचे उद्दतीकरण होय. यानंतर वाणी, ज्याला आपण वाक म्हणतो वाकब्रह्म. वाणीचे उद्दतीकरण करता करता वाणी इतकी दिव्य व्हायला हवी की सरस्वतीलाही वाटायला हवे की मी त्याच्या वाणीत येऊन राहावे. वाल्मिकींनी स्वतःची वाणी इतकी दिव्य केली की सरस्वती त्यांच्या वाणीत येऊन राहिली. अशा महापुरुषाचे वर्णन शास्त्रामध्ये आलेले आहे. सामान्य साधूची वाणी, अर्थाचे अनुसरण करते परंतु आद्य ऋषीच्या वाणीला अर्थ अनुसरतो म्हणजे त्यांची वाणी प्रभावी असते आणि तिच्या पाठीमागे अर्थाला धावावे लागते. याचे कारण त्यांचे मुखारविंद होय. थोबाड, तोंड ,मुख आणि मुखारविंद अशी आपल्या वाणीची श्रेणी असते. यामध्ये ज्याची वाणी जशी असेल, तशी त्याची श्रेणी असते. आपले तर थोबाड आहे. त्याचे मुखविंद व्हायला कमीत कमी चार जन्म घ्यावे लागतील .आपल्या थोबाडाचे मुखारविंद होण्यासाठी वाणी काय बोलते ? कुणासाठी बोलते ? विचार व वाणी याचा संबंध काय ? या गोष्टीवर वाणीची दिव्यता अवलंबून असते.

सर्व इंद्रियाचे उद्दतीकरण केल्याशिवाय जीवन विकास शक्य नाही. माशी सर्व ठिकाणी बसते. वर आपण पाहिलं मिष्ठानावर जशी बसते तशी उकिरड्यावरही बसते. इंद्रियाचेही तसेच आहे माणूस उपनिषद ऐकायलाही बसतो आणि वाईट काम करणाऱ्या गुंडांमध्येही बसतो. माणसाने मनाचे नियमन करून मी कुठे बसायचे ? माझ्या इंद्रियांना कुठे घेऊन जायचे ? हे निश्चित करायला हवे. आपण पूजा करायला बसतो पण आपल्या पूजेने भगवंताला आनंद होत नाही याचे कारण भगवंत आपल्याला बरोबर ओळखतो की आपण पूजा कशासाठी करतो आहोत! पूजा करत असताना कित्येक लोक भगवंताला असे सांगत असतात की हे प्रभू सर्वांचे कल्याण कर, हे ऐकून भगवंताला असे वाटते की हा शहाणा मला उपदेश करत आहे. असो इंद्रिय जशी विकसित करायला हवेत तसे मनही विकसित करायला हवे. याचे कारण इंद्रियाच्या जवळच मन आहे. मनाचे सहकार्य असेल तरच इंद्रिय चांगली होतील. आपल्याला रस्त्याने जाताना एखाद्या वेळेस एखाद्या महापुरुषाची भेट होते. आपले डोळे त्यांना पहातातसुद्धा पण मन दुसराच विचार करत असेल तर समोरून कोण गेले ? हे ध्यानात येत नाही .तसेच मन दुसऱ्या ठिकाणी गेलेले असेल तर खाण्यातही मन लागत नाही .थोडक्यात आपल्या मनाचं नियमन करणे हे अत्यंत महत्त्वाच आहे तर या मनाचे, बुद्धीचे, आत्म्याचे व्यवस्थित रित्या केलेले निरीक्षण, केलेला अभ्यास हा अध्यात्मिक अभ्यास आहे म्हणून मनाच्या योग्य नियंत्रणासाठी संचलनासाठी मन प्रसन्न करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे!

# श्री दत्ता जायभाये: डोंगरचा साक्षेपी संपादक!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**आपण कुठं जन्माला यावं हे जरी आपल्या हातात नसलं तरी; आपण काय व्हावं आणि काय कार्य करावं? हे नक्कीच आपल्या हातात असतं! परिस्थितीला सामान्य माणसं शरण जातात; असामान्य माणसं असलेल्या खडतर परिस्थितीवर मात करून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करतात. एवढं लिहिण्याचं कारण म्हणजे किनवट सारख्या दुर्गम भागातून साप्ताहिक वंजारी पुकारचे संपादक मित्र श्री दत्ता जायभाये यांचा जन्मदिवस! घरी अठराविश्व दारिद्र्य, जेमतेम शेती आणि त्यात खाणारी दहा तोंडं! अशा परिस्थितीत जन्मलेले आणि वाढलेले दत्ता जायभाये यांचं बारावी पर्यंतच शिक्षण झालं. पुढे शिक्षण घेणे त्यांना कठीण झाल्यामुळे त्यांनी आपल्या आई-वडिलांना हातभार लावायचं ठरवलं. चार बहिणी तीन भाऊ आणि काळ्या आईशी सामना करणारं कुटुंब!**



अशी अवस्था असतांना देखील घरातली पंढरीची वारी थांबली नव्हती. आई-वडिलांनी संस्कारित केलेली सगळी लेकरं काही ना काही कामाला लागली. त्यापैकी दत्तांना मात्र गावाकडं आणि शेतात मन रमायचं नाही. आपण काहीतरी वेगळं करावं! आपलं नाव होईल असं काम करण्याची ओढ लागली. त्यातच किनवटला जाणे वेगवेगळी वर्तमानपत्रे पाहणे.

यातूनच दत्ता "आपलं असं एखादं वर्तमानपत्र असलं पाहिजे" या विषयानं झपाटून गेले. साधारणतः दहा वर्षापूर्वी वर्तमानपत्र, पत्रकार आणि पेपरला आलेली बातमी याचं अप्रूप जास्त होतं. ते अप्रूप आजही आहे परंतु मिडिया आणि विविध लिंकमुळे प्रिंट मिडीयावर नक्कीच परिणाम झाला आहे. आता छापील पेपर हाती येण्यागोदर सर्वच ई-पेपर वाचायला मिळत आहेत. एक दशकापुर्वीचा काळ मात्र छानच होता. यातच काही पत्रकार मित्रांनी दत्ताला वर्तमानपत्र सुरु करण्याचे प्रोत्साहन दिले. त्यात त्यांना रोजचं वर्तमानपत्र चालवणं म्हणजे सगळ्या बातम्या जमा करणं, छापणं आणि वितरीत करणं हे मोठं जिकरीचं काम वाटू लागलं. अनेक प्रश्न आणि समस्या समोर उभ्या होती. अशा खडतर परिस्थितीतूनच त्यांनी २०१२ साली साप्ताहिक वंजारी पुकार नावाने साप्ताहिक सुरु केले. सुरुवातीला प्रिंटसाठी पैसे नव्हते. हातउसने पैसे घेऊन त्यांनी पहिल्यांदा साप्ताहिक प्रकाशित केले. हळूहळू त्यांना सगळं जमू लागलं आणि पाहता पाहता आज साप्ताहिक वंजारी पुकार दशक पुर्ती करून अकराव्या वर्षात आले आहे. आज संपादक दत्ता जायभाये यांचा वाढदिवस!

खडतर संघर्ष आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर दत्ता जायभाये एक संपादक म्हणून मोठ्या सन्मानाने उभे आहेत. एकीकडे लोक काम काय करावे ? असा प्रश्न विचारून हातावर हात देऊन बसलेले असतांना दत्ता जायभायेंनी परिस्थितीवर मात करून आपले साप्ताहिक सुरु केले असून लवकरच वंजारी पुकार नावाचे वर्तमानपत्र सुरु करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. वर्तमानकाळात प्रिंट मिडिया ऑक्सिजनवर असतांना त्यांनी दाखवलेलं हे धाडस मोलाचे आहे. आज वाढदिवसाच्या निमित्ताने जायभाये यांनी याहीपेक्षा जोमाने कार्य करावे ही अपेक्षा आहे.

आज त्यांनी लावलेले साप्ताहिक वंजारी पुकार हे वटवृक्षात रूपांतरित होत असून अल्पावधीतच हे साप्ताहिक महाराष्ट्रभर लोकप्रिय झाले आहे. खरंच जायभाये हे मोठ्या तळमळीने पत्रकार आणि संपादक म्हणून मोठ्या क्षमतेने काम करत आहेत.

यापुढेही ते जोमाने काम करून समाजातील अन्याय, अत्याचाराला वाचा फोडतील. त्याचबरोबर आपल्या साप्ताहिकातून संपादकीय माध्यमातून वर्तमान काळातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विषयावर मोठ्या ताकदीने आपले विचार मांडून नवनवीन विचारांचे चिंतन-मंथन ही अपेक्षा त्यांच्याकडून आहे. त्यासाठी त्यांच्या निर्भीड विचारांचा प्रसार-प्रचार मोठ्या शक्तीने करतील हीच अपेक्षा ठेवून पुन्हा एकदा वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देऊन हा शब्द प्रपंच इथे थांबवतो!

# राजकारणाचा चिखल की चिखलाचं राजकारण



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**चिखल म्हणजे दलदल आणि याच दलदली कडे पाहण्याचा सर्वसामान्य माणसांचा दृष्टिकोन हा नेहमीच उद्विग्न असाच असतो. चिखला पासुन स्वतःला दुर कसं ठेवता येईल अथवा हा चिखल आपल्या अंगावर लागणार नाही याची काळजी घेताना प्रत्येजण दिसतो. राजकारण म्हटलं कि बहुतांश लोकांच्या आवडीचा विषय पण सध्या राजकारणाला चिखलाचा स्वरूप प्राप्त झाल्याची भावना लोक मनात निर्माण होऊ लागल्याने त्या विषयी उद्विग्नता वाढीस लागली आहे.लोकशाही मध्ये मतदार हा राजा असतो .पण हल्ली राजकारणात जे काही घडतंय ते पाहुन हाच मतदार राजा म्हणजे सामान्य माणूस हवालदिल आहे.याची प्रचिती सोशल मध्यातुन व्यक्त होताना सगळीकडे आपण पाहतोय.**

तसं पाहिलं तर सध्याची परिस्थिती पाहुन मनात अशा पद्धतीने प्रतिक्रिया निर्माण होणं हे देखील स्वाभाविक आहे. मनाविरुद्ध घडुन सुद्धा ते पचनी पाडण्याची मानसिक तयारी ठेवण्याच कौशल्य हा सध्याच्या राजकारणाचा पाया झाल्याने राजकारणाचा पार चिखल झाला आहे असंच काहीसं चित्र सर्व सामान्य माणसाच्या मनात निर्माण होताना दिसत आहे. लोकांचा विश्वास आणि लोकमताचा आदर हा प्रमुख आधारस्तंभ असणार राजकारण हे खरंया अर्थाने लोककल्याण करण्याचा वसा आणि वारसा समजला जातं असे पण साध्य हेच वैचारिक राजकारण पातळी सोडुन टोकाच्या भुमिकेत पोहचलं आहे . सोय म्हणजे राजकारण नाही अथवा सोयीचा आपल्या सोयीनुसार वापर देखिल राजकारण नाही.पण तत्वांच राजकारण संपुष्टात आल्याने आता सोयीच्या राजकारणाचे वेगवेगळे प्रयोग होत आहेत.आणि त्याच नामकरण देखिल जो तो आपापल्या सोयीनुसार करत आहे .कोण चुक आहे कोण बरोबर आहे हा नंतराचा विषय आहे. पण लोकांच्या नजरेस जे पडतंय ते खुप भयानक आहे. मग प्रश्न हाच आहे कि नेमकं खरं काय आहे आणि खोटं काय ? आहे. लाभ आहे तोपर्यंत कोणाचही खर रूप प्रकट होत नाही पण लाभ संपला कि मग मात्र कोण गुरू कोण शिष्य कसले उपकार हे सध्याच युगाच भयानक वास्तव आहे.खरं पाहिलं तर राजकारण हि एका विचार धारा असते . ज्या मध्ये तत्व सत्व निष्ठा जपली जाते ती जपली पाहिजे आणि ती जपणारी माणसं देखिल याच मातीत होऊन गेली. पण सध्या सोयीनुसार विचारधारा बदलण्याची आधुनिक सोय राजकारणात रूढ झाली आहे. आणि सत्ता हिच सर्वपरी आहे मग सत्तेसाठी सर्वकाही असंच काहीसं सध्या तरी चालेल आहे.पण हे सगळं घडत असताना हे चित्र पाहुण सामान्य माणुस मात्र हवालदिल झाला आहे.



राजकारणाचा चिखल झाला कि चिखलाचे राजकारणा झाले हे कळायला मार्ग नाही.वैचारीकता सिद्धांत तत्व हा राजकारणाचा पाया होता पण हा पाया ढासळुन साध्य सत्ता हाच राजकारणाचा मुख्य उद्देश ठरत आहे. प्रत्येकाला सत्ता पाहिजे मग मार्ग कोणाताही असो आणि सगळ्या मध्ये भावनिक असणारा मतदार मात्र अचंबित आहे. कि मतदान कोणाला द्यायचे. राजकारणात कोणीही कोणाचा कायमचा शत्रु अथवा मित्र नसतो. प्रत्येकाचं एक ईप्सित असतं आणि हेच ईप्सित साध्य करताना एकमेकांच्या वर आरोपांची राळ उठवणारे चिखल फेक करणारे जेव्हा एकाच ताटात जेवायला बसतात तेव्हा सर्व सामान्य माणसाच्या मनात प्रश्न निर्माण होणं स्वाभाविक आहे. राजकारणाचा चिखल झाला कि चिखलाच राजकारण झालं. मतदार राजा हा राजकारणाचा मुख्य केंद्रबिंदू आहे पण याच केंद्रबिंदू च्या हे सगळं पचणी पडेल का हे तर वेळ काळ ठरवेल. जिंकण आणि हरण या पलिकडे म्हणजे जय पराजय या पेक्षाही आपली भुमिका विचारधारा घेऊन लोकांचा विश्वास सार्थ करण हे खरं राजकारण असत तसं पाहिलं तर राजकारणात सत्ता हि गौण असते . सत्ता येत असते जातं असते .पण सत्तेच्या भोवती फिरण्याच्या नादात लोकाभावनेला तिलांजली मिळता कामा नये. हे सुत्र आणि तत्व पायदळी तुडवून पुढे जाणं उचित नसतं पण हे तत्त्व साध्य तरी कोणाला पचेल अस नाही. पण लोक भावना जपणं हे सध्यातरी कोणालाही पटण्यासारखं नाही.आपला वारू पूढे जावा यासाठी कोणत्याही पातळीवर जाण्याची मानसिकता निर्माण होणं मुळात हेच घातक आहे .पण जे सध्या घडतंय ते घातक तर आहेच पण भविष्य अंधकारमय करण्यासाठी पुरेसं आहे.कोण जिंकल कोण हरल हे निवडणुकी पुरत मर्यादित असल पाहिजे एरव्ही विचारधारा ही महत्वपूर्ण असली पाहिजे. हाच राजकारणाचा आश्वासक चेहरा असतो. तसंही राजकारण हे आश्वासक असतं पण सध्याच राजकारण दिवसेंदिवस खुप गढुळ होत चाललं आहे.

तत्व , निष्ठा, मुल्य पायदळी तुडवून आपणच कसे निष्ठावंत आणि निष्ठावान आहेत हे प्रकट करण्याचा फंडा तर अजब गजब आहे. हे सगळं पाहुण लोकशाही सुद्धा मनोमन चिंतन करत असेल. जो सगळ्यात जास्त लाभानवित होतो सगळ्यात मोठा अन्याय त्यांच्यावर होतो हे तत्वज्ञान तर भल्या भल्या ज्ञानी पंडितांची बुद्धी बंद पडेल असंच कहिस आहे.एंकदरीत काय तर माझं सगळं खरं माझ्यावर सगळ्यात जास्त अन्याय झाला मला अपमानित केल गेल वगैरे वगैरे हे सगळं ठरलेल गणित असतं . वेळ काळ पात्र बदलतं मात्र सोंग तेच असत. अन्याय सगळ्यांवरच झाला तर मग न्याय कोणालाच मिळाला नाही का ? मला योग्य न्याय मिळाला मी समाधानी आहे असं शेवटी बोलेल असं एकही पात्र राजकारणात शिल्लक नसाव हि किती मोठी शोकांतिका आहे. सत्य कधीतरी कुठेतरी मान्य झालं पाहिजे आणि मन समाधान पण झालं पाहिजे.एखाद पद जबाबदारी भुषवली तर सन्मान जनक पद्धतीने तिथुन बाहेर पडलं पाहिजे. पदाची असक्ति असता कामा नये. राजकारण ही जन सेवा आहे तर मग जनसेवा ही सगळ्यांना करण्याची संधी उपलब्ध होईल असं वागल पाहिजे. मोह किती असावा याला पण मर्यादा असते. आणि ही मर्यादा समजली तर मग कुठे थांबायचे हे पण समजते. शेवटी लोकांचा विश्वास हा महत्त्वाचा असतो आणि तो टिकविणे, वृद्धिंगत करणे त्याच रक्षण करणं हे खरया अर्थाने लोकशाही राजकारणात अपेक्षित असतं पण विचारांच्या भोवती फिरणार राजकारण समाजकारण हे पदाभोवती फिरू लागल्याने राजकारणाचा चिखल झाला कि चिखलाच राजकारण झालं हे मात्र उमजायला तयार नाही.

# सरकारी कार्यालयांमध्ये एजंटशिवाय कामेच होत नाहीत!

आधुनिक केसरी

**कधी कधी सर्वच ठिकाणी स्वतःची कामे स्वतःच करावी असे मनापासून वाटते पण आपल्याडके सरकारी कागदपत्र जमा करण्याची हातोटी नाही आणि त्या कामा साठी मिळणारे अर्ज आपल्याडून पूर्णपणे भरले जातं नाहीत. मग त्यासाठी बऱ्याच खेपा माराव्या लागतात किंवा आपण तो अर्ज भरण्यासाठी आळस करतो. मग यावर त्या कार्यालयातील अधिकारीच सांगतो की अर्ज एजंट मार्फत भरून घ्या. म्हणून आपल्याला सर्वच क्षेत्रात मदत घ्यावी लागते.**

तसें पाहिले तर खाजगी एजंट आणि सरकारी एजंट अश्या दोन प्रकारात एजंटची मांडणी करता येईल. त्यातील सरकारी एजंट हे फक्त सरकारचीच कामे करतात. सरकारच्या तिन्ही सुरक्षा यंत्रणा, गुप्तहेर विभाग आमी इतर विभागातून हे एजंट काम करत असतात. आणि खाजगी एजंट तळागाळातील सर्वच विभागात काम करतात. असे एजंट खाजगी कार्यालय ते सरकारी कार्यालयातील सर्व कामे एजंट करतात. यांमध्ये खाजगी एजंट संस्कृती चांगलीच बळावात चालली आहे. परंपरागतरित्या आर. टी. ओ., तहसीलदार कार्यालय, म्हाडा, जिल्हा परिषद कार्यालये, सहकारी बँकाचे कर्ज विभाग, पासपोर्ट कार्यालय, रेशनिंग ऑफिस, रिअलइस्टेट, पोलीस स्टेशन, ट्रॅफिक पोलिसांचे जनता व दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये खाजगी एजंटांशिवाय कोणतेच काम होत नाही.



अशा सर्व कार्यालयांमधील ही एजंट संस्कृती आता लोकांनीही स्वीकारली आहे. त्यामुळे या कार्यालयांमध्ये कोणतेही काम करून घेताना एजंटांशिवाय काम होणार नाही, ही सवय लोकांनीही स्वीकारली आहे. वरील कार्यालयांचे अधिकारी व कर्मचारी देखील त्यांच्यामार्फत येणारी कामेच मार्गी लावतात. बाकीच्या कामामध्ये चुका काढून ते काम नाकारले जाते किंवा उगाचच खोटी कारणे दाखवून ते काम बाजूला करून ठेवतात. मग लोक वैतागून त्या नागरिकाने खाजगी एजंटामार्फतच आले पाहिजे, अशी व्यवस्था करून ठेवतात.

यापूर्वी सुद्धा या एजंट विरोधात मोहोम आखण्यात आली होती. पण त्या मोहिमेला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. आणि एजंटच आपली कामे चांगल्या प्रकारे करून देऊ शकतात हे लोकांनी मान्य केले. आणि पुन्हा खाजगी एजंट कामास लागले. मात्र आपण केलेले काम दहा रुपयात होते त्याला चार खेपा मारव्या लागतात तेच काम एजंट विस रुपयात एका खेपेत करतो. तेही विनासायास. कारण या एजंटांच्या मार्फत साहेबांसमोर जे कागद जातात त्यावर त्यांची एक विशिष्ट निशाणी असते. याचा अर्थ हे काम एजंटामार्फत आहे व सायंकाळी यातली लाचेची रक्कम हिशोब करून साहेबांना तो एजंट पोहोचती करणार आहे. असा त्याचा अर्थ असतो. अशी लाचकोरी वर नमुद केलेल्या कार्यातून जास्त प्रमाणात चालते.

याशिवाय जमिनींचे एन ए करण्यासाठी देखील खाजगी व्यक्तीला प्रचंड त्रास होतो. मात्र खाजगी एजंटाला तगडी रक्कम दिली तर सर्व ' क्युरी ' मधून सहीसलामत मार्ग काढून एनए ऑर्डर ताबडतोब हातात पडते. शासनाच्या विविध योजनांसाठी - अनुदान मंजुरीसाठी देखील खाजगी एजंटांचा सुळसुळाट विविध शासकीय कार्यालयांमध्ये सुरू झालेला आहे. साधे संजय गांधी निराधार योजनेचे काम करण्यासाठी सुद्धा एजंट लागतो. खाजगी एजंट ही संकल्पना आता सर्वच शासकीय विभागांमध्ये रुजू होऊ लागली आहे. ही एक संस्कृती बनत चालली आहे. ती थांबवणे फारच कठीण काम आहे. मात्र काही सामाजिक संस्थानी अशा एजंट विरोधात आवाज उठवीला होता. अलीकडे " नो ब्रोकर " पद्धत सुरु झाली आहे. म्हणजेच कोणत्याही प्रकारची दलाली न घेता काम करून देणे. ही पद्धत सर्वत्र सुरु होणे गरजेचे आहे.

# गोरगरिबांचे अधिकारी जातात तरी कुठे..?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**हलाखीच्या परिस्थिती मध्ये शिक्षण घेऊन, मेहनत करून अनेक जन शासकीय अधिकारी कर्मचारी होतात. शासकीय अधिकारी कर्मचारी झाल्यामुळे गावातील लोकांना आनंद होतोच परंतु माणवता व माणुसकी या नात्याने ज्या कोणाला माहिती झाले कि अमुक अमुक व्यक्ती हलाकिच्या परिस्थिती मध्ये राहून नोकरी वर लागला याचे कौतुक अनोळखी लोकही करतात. बऱ्याच ठिकाणी नागरी सत्कार करून त्यांचा गौरव केला जातो. आणि हे करताना सर्वसामान्य माणसाचा कोणताही स्वार्थ नसतो.**

परिस्थिती ची जाणीव ठेवून केलेल्या मेहनतीचा तो मानसन्मान व नवीन तरुणांना प्रेरणा देनारा तो सत्कार असतो. नागरी सत्कारामध्ये स्वतः च्या कुटूबांची आर्थिक परिस्थिती, घर चालवण्यासाठी होणारी ओढाताण, चैनीच्या व गरजेच्या वस्तुचा तुटवडा अशा अनेक पैलुंवर कर्मचारी अधिकारी प्रकाश टाकून एकंदरीत आपली परिस्थिती सर्वांसमोर मांडून किती हलाखीच्या परिस्थिती मधुन मी यश संपादन केले हे तो सिद्ध करत असतो. हलाखीच्या परिस्थिती मध्ये जिवन जगुन अधिकारी होणारे, विद्वातेच्या जोरदार टॉप करणारे अधिकारी मात्र सर्व सामान्य जनतेच्या प्रश्नांविषयी जास्त संवेदनशील असतात असे दिसत नाही. उलट एकदा अधिकारी झाले तर त्यांचे नावही बरेच लोक विसरून जातात. परंतु हा नियम सर्वांनाच लागु नाही. काही अधिकारी ज्यांनी परिक्षेत टॉप जरी नसेल केले तरी त्यांच्या कामाच्या शैलीमुळे ते सर्वसामान्य लोकांच्या मनात आदरांचे स्थान निर्माण करतात. भ्रष्टाचार, अवैध धंद्याला आळा घालून लोकांचे प्रश्न, तक्रारी यांना प्राधान्य देऊन वेळेत लोकांची कामे व्हायला पाहिजे यावर ते भर देतात. आणि सर्वसामान्य जनतेला या व्यतिरिक्त एका अधिकाऱ्यांकडून दुसरे काहीच अपेक्षित नसते. आणि हेच काम अधिकारी वर्गाचे असते. म्हणजे मी किती गरीबीतून वर आलो, माझी किती हलाखीची परिस्थिती होती यापेक्षा अधिकारी झाल्यानंतर मी किती गरीबांचे काम करतो, किती गरीब लोकांचा येण्याजाण्याचा, मजुरीचा खर्च वाचवून वेळेत काम करतो हेच अधिकाऱ्यांचे कर्तव्य व गरीबी आणि हलाकिच्या परिस्थिती ची जाणीव असते.



अशा अधिकाऱ्यांना लोक विसरत तर नाहीत आणि त्यांच्या कार्याचा गौरव सर्वसामान्य लोकांच्या शब्दीक बोलण्यातून सदैव होत असतो. पण अशा अधिकाऱ्यांची संख्या खुप कमी आहे. परंतु इतर बहुतांश अधिकाऱ्यांचे काय. एकदा खुर्ची मिळाली की ते कार्यातून जनतेला कधी माहितीच होत नाही. तालुक्यात, जिल्ह्यात कधी कोणता अधिकारी येतो आणि जातो याची कल्पना देखील सर्वसामान्य लोकांना नसते. अधिकारी वर्गाने विषेश असे काही नाही केले तरी चालते परंतु ते ज्या पदावर आहेत तेथे राहून त्यांनी त्यांचे संविधानीक कर्तव्य जरी पार पाडले तरीही जनता अधिकाऱ्यांना डोक्यावर घेते. परंतु सध्या जनतेचा आवाज बघितला तर अधिकारी लोक सर्वसामान्य लोकांचे कामावर लक्ष देत नाहीत, काम वेळेवर होत नाहीत, पैसे दिल्याशिवाय काम होत नाही अशा प्रकारचे अनुभव बहुतांश लोकांना येतातच. दररोज कोणी ना कोणी भ्रष्टाचार करताना लाच घेताना पकडला जातो. यावरून प्रशासनातील हा उघड भ्रष्टाचार आहे. अशा वेळी गोरगरीब घरातून अधिकारी झालेला अधिकारी जर सर्वसामान्य लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी सक्रिय नसेल तर गरीबी मध्ये जिवन जगलो, मीही गरीबांचाच मुलगा आहे हे सांगण्याचा नैतिक अधिकार त्यांना नसतो. गोरगरीब घरातून अधिकारी झालेले लोक गोरगरीब लोकांसाठी काम का करत नसतील ? अधिकारी झाल्यावर गोरगरीब जनतेत का जात नसतील ? अधिकारी हे शासकीय पदाचा संविधानीक वापर का करत नसतील ? अधिकाऱ्यांमध्ये एक माणूस असतो आणि माणसाला माणुसकी असते. मग अधिकारी माणुसकी का दाखवत नसतील. केवळ आपले कर्तव्य योग्य प्रकारे न बजावल्यामुळे अधिकारी वर्गा बद्दल सन्मान हा सर्व सामान्य लोकांच्या मनात राहत नाहीत. जे लोक कायद्याच्या चौकटीत राहतात आणि जनतेसाठी काम करतात त्या अधिकाऱ्यांची बदली झाली तरीही लोक दुतर्फा गर्दी करून भावनिक निरोप देतात. पण बहुतांश अधिकारी येतात कधी जातात कधी हे ही लोकांना माहीती नसते. अधिकारी झाले तर एका वेगळ्या विश्वास राहून सर्व सामान्य जनतेला व कर्तव्याला विसरणारे अनेक लोक आहेत तर अधिकाऱ्या सोबतच आपण माणूस आहोत आणि माणसाची सेवा करण्याचाच पगार आपल्याला सरकार देते या भावनेतून काम करणारे अधिकारी खरचं वंदनीय असतात. सध्याच प्रशासकीय सेवेतील अधिकारी दाम्पत्याने आपल्या बाळाला सरकारी अंगणवाडी मध्ये टाकून आपली नैतिक जबाबदारी पार पाडली. असे अधिकारी देशाला व समाजाला दिशाच देत नाहीत तर सकारात्मक ऊर्जा भरून एक इतिहास घडवत असतात. गरीबीचे भांडवल करून भाषणे देणारे अधिकारी, निवड प्रकियेमधील मुलाखती मध्ये जे बोलतात त्या प्रमाणे विस टक्के तरी विचार आत्मसात केले असते तरीही सर्व सामान्य जनतेपर्यंत अधिकाऱ्यांचे कार्य पोहचले असते. गरीबीतून वर आलोय, गरीबांसाठी काम करण्याची संधी मिळाली, सर्वसामान्य लोकांसाठी काम करण्याची ईच्छा असणारे एकदा पोस्टींग झाली की नंतर कोणाला दिसतही नाहीत. कुठे जातात हे लोक ? अधिकारी केवळ भाषणापुरतेच मर्यादित झालेले आहेत का ? आपल्या कामातून जनतेचे मन जिंकुन घेण्याची क्षमता अधिकाऱ्यांमध्ये नाही का ? जर अधिकारी लोक सर्व सामान्य लोकांचे काम करत नसतील तर त्यांचे पद आणि त्यांची विद्वतेचा नेमका सर्वसामान्य जनतेला फायदा तरी काय ? अधिकारी झाल्यावर ओळख नसतानाही सत्कार करणारे किंवा हित चिंतणारे सर्व सामान्य लोक असतात परंतु अधिकारी होऊन खुर्चीवर बसल्यावर लोकांचे हित तर सोडून द्या पण कर्तव्य ही बरोबर न बजावणारे अधिकारी नोकरी मधून फार फार पैसा कमवुन स्वतः चे घर आर्थिक दृष्टीने सक्षम करू शकतात परंतु नैतिक दृष्टीने मी अधिकारी आहे आणि सर्व सामान्य लोकांची सेवा करून अधिकारी सर्व सामान्य लोकांसाठी काय करू शकतो याचे उदाहरण म्हणून नैतिक दृष्टीने जर उभे राहु शकत नसाल तर ते पद आणि विद्वत्वा स्वार्थासाठी असून वरुन कोणाचा तरी अंकुश आहे हेच सिद्ध होते. अधिकारी ही बोलका पोपट असतो हीच प्रथा जर रूजत गेली तर कर्तव्य संविधानीक पद्धतीने कसे आणि कोणी राबवायचे ? सर्वसामान्य जनतेचा राजकारणावरचा विश्वास पुर्ण उडाला आहे. परंतु प्रशासकीय व्यवस्थेवरचा विश्वास कायम राहण्यासाठी जनतेच्या हिताची कामे करणे आवश्यक आहे. त्याशिवाय जनतेचा प्रशासनावरील विश्वास दृढ होणार नाही. प्रशासनात राहून आपण जर लोकांचा सकारात्मक विश्वास संपादन करू शकत नाही, सर्वसामान्य जनता जर खुर्चीतील माणासाचा माणूस म्हणून स्विकार करू शकत नसेल तर त्या व्यक्तीचे पद व विद्वता हि लोकांसाठी नाही हेच कळून येते. परंतु अनेक अधिकारी असे आहेत की जनतेचा आणि त्यांचा प्रत्येक संबध जरी आला तरीही त्या अधिकाऱ्यांच्या कामावरून त्या अधिकाराऱ्यांबदल ईतंभुत माहिती लोकांना असते. मनामध्ये त्यांच्या कार्याबद्दल आदर असतो. परंतु असे अधिकारी संख्येने कमी असल्याने ते जातील तेथील परिस्थिती सुधारतात परंतु तेथून गेल्यावर परिस्थिती जैसे थे अशी होते म्हणून मग मनात प्रश्न निर्माण होतो की गोरगरीबांचे जे मुल अधिकारी होतात ते कुठे जातात ? देशात, राज्यात पहिला काही संख्येत टॉप करणारे विद्वान अधिकारी नौकरी मिळाल्यावर कार्यातून दिसत नाही. हि वस्तुस्थिती आहे. परंतु ज्या इमानदार व सक्रिय अधिकाऱ्यांमुळे भ्रष्टाचार, अवैध धंदे यावर वचक बसून शांतता व सुव्यवस्था अबाधित राहते त्यांच्या कार्याचा व कर्तव्याचा गौरवही होणे आवश्यक असते. तरीही बहुतांश अधिकाऱ्यांबद्दल जनतेच्या मनात प्रश्न मात्र कायम असतो.

# एकहाती सत्तेपासून शरद पवार वंचितच



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**-२६ नोव्हेंबर २०१२ साली भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून आम आदमी पार्टी या एका नव्या पक्षाचा उदय झाला.दिल्ली पाठोपाठ पंजाब मध्ये आम आदमी पक्षाने विधानसभा निवडणुकीत एकहाती सत्ता मिळविली.आजही इतर राज्यात उमेदवार उभे करून आम आदमी पक्षाचे अस्तित्व राष्ट्रीय स्तरावर निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.दिल्लीत २०१५ ला घेण्यात आलेल्या विधानसभा निवडणुकी मध्ये आम आदमी पक्षाने झाडू चिन्हावर निवडणूक लढविली होती.७० पैकी ६७ जागांवर ऐतिहासिक असे यश मिळविले.**

२०१४ ला लोकसभेत मोदींची लाट दिसली.परंतु दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीत मात्र अरविंद केजरीवाल यांच्याच आम आदमी पक्षाचाच डंका दिसून आला.तसेच २०२० ला सुद्धा ६२ जागांवर विजयी होत दिल्ली "आप" ली करत अरविंद केजरीवाल यांनी सत्ता एक हाती राखली.गेल्या वर्षी २०२२ ला पंजाब मध्ये ११७ पैकी ९२ जागांवर विजय मिळवित आप ने एकहाती सत्तेचा झेंडा रोवला.२०२२ मध्ये आम आदमी पक्ष राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता प्राप्त झाला.२०१२ पासून ते २०२२ पर्यंत हा १० वर्षाचा राजकीय प्रवास घडत असताना आम आदमी पक्षाने एकहाती सत्ता मिळविणारे शिखर गाठले. नव्याने राजकारणात आलेला आम आदमी पक्ष दिल्ली पाठोपाठ पंजाब राज्यात एकहाती सत्तेवर विराजमान होऊ शकला.

देशाच्या राजकारणात आपच्या राजकीय अस्तित्वाची चर्चा आहे.राजकारणात मुरलेल्या अनेक दिग्गजांसुध्दा स्वतःच्या पक्षाची किंवा बंडाळी करून स्व पक्ष निर्माण करणाऱ्या नेत्यांना एकहाती सत्ता मिळविता आलेली नाही.

१९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या राजकारणात ज्यांच्या राजकारणाची चर्चा होत असते ते शरद पवार सुद्धा आजपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या स्व पक्षाची बहुमताच्या आकड्याने एकहाती सत्ता मिळवू शकलेले नाहीत.काँग्रेसला सोबत घेतल्या शिवाय सत्तेचे गणित महाराष्ट्राच्या राजकारणात जुळलेच नाही.पक्षातून फुटून जाऊन जेव्हा स्वतःचा पक्ष निर्माण केला जातो.तेव्हा मतांच्या विभागणीने अशी राजकीय परिस्थिती उदभवत असते.राजकारणात मुरलेला एक हुशार मुत्सद्दी राजकारणी म्हणून शरद पवार यांच्या कडे पाहिले जाते.राजकारण कसे खेळावे अन आपल्या अवती भवती सत्ता कशी आणावी.याचे राजकीय सूत्र शरद पवार यांना चांगलेच अवगत आहे. सत्ता बदल घडवून आणणारे शरद पवार मात्र त्यांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या राजकीय कारकिर्दीत एकहाती सत्तेची किमया घडवू शकलेले नाहीत.आज त्यांचाच राष्ट्रवादी पक्ष फुटलेला आहे.

सद्यस्थितीतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची राजकीय वाटचाल वेगळ्याच दिशेने चाललेली आहे.परंतु पक्ष फुटीच्या राजकारणाची घडामोड शरद पवार यांच्या सारख्या नेत्याला काही नवीन नाही.कारण शरद पवारांच्या राजकारणाने अनेक राजकीय चमत्कार घडतात.याची भीती विरोधकांना सुद्धा असतेच असते. म्हणून तर सर्वच राजकीय पक्षांना आपल्या समवेत शरद पवार हवे हवेसे वाटतातच.आज देशपातळीवर भाजपच्या विरोधात लढण्यासाठी विरोधकानी बांधलेल्या "इंडिया" या मोटेत सुद्धा शरद पवार आहेत.

शरद पवारांचे वय ८३ असले तरी ते आजही एखाद्या तरुण योद्धया प्रमाणे राजकारणाच्या मैदानात आपल्याच पक्ष फुटीतील लोकांबरोबर लढायला तयार आहेत.पक्ष बांधणी साठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाण्यासाठी सज्ज झालेले आहेत.राजकीय अनुभव तर दांडगा आहेच शिवाय प्रत्येक राजकीय परिस्थितीतून मार्ग कसा काढायचा हे शरद पवारांच्या रणनीतीतून वेळ आणि काळच आपल्याला दाखवून देत असतो.

एका दगडात किती जणांची शिकार झाली.हे नंतरच समजते.१९९९ पासून ते २०१४ पर्यंत त्यांनी अनेकांची शिकार करता करता अनेकांना सत्तेच्या सिंहासनावर बसविले.अन्य छोटे मोठे राजकीय पक्ष विविध चळवळीतील संघटनांतून उदयास आलेल्या नेतृत्वास आपल्याकडे घेण्यास ते यशस्वी ठरले.आज पक्ष फुटण्याची वेळ खुद्द शरद पवारांच्या राष्ट्रवादी वर आलेली असताना ही राजकीय खेळी शरद पवारांच्या आशिर्वादाने तर चाललेली नाही ना ?हा सवाल जनता सुद्धा विचारत आहे.राजकारणात घडलेल्या प्रत्येक घडामोडी वरून सर्व चर्चा शरद पवारांच्या अवती भवती येऊन थांबते.हेच तर त्यांच्या राजकारणाचे सूत्र असते.१९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना करणारे संस्थापक अध्यक्ष व सर्वेसर्वा शरद पवार हे कायम महाराष्ट्रात सत्तेचे केंद्रबिंदू बनले.११९९ पासून ते २०१४ पर्यंत पक्ष सत्तेत कायम राहण्यासाठी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचीच त्यांना सदैव साथ मिळत गेली.१९९९ नंतर कॉग्रेस हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मित्र पक्ष म्हणून महाराष्ट्राच्या सत्ता कारणात २०१४ पर्यंत सत्ता उपभोगत आलेला आहे.कधीच पक्ष फुटीची वेळ दोन्ही पक्षावर आलेली नाही.राष्ट्रवादी पक्षातील अजित पवार आणि भाजपचे देवेंद्र फडणवीस यांचा तो पहाटेचा शपथ विधी आणि आताची राजकीय परिस्थिती हे सगळं बघता.पक्ष फुटतो आणि पक्षावर दावे कसे केले जातात. हे शिवसेना फुटीचे मोठे उदाहरण हे राजकारण्यांसमोर आहेच.परंतु पहाटेच्या शपथ विधी बाबत तो साहेबांचा आशीर्वाद होता.असे ही मध्यंतरी म्हटले गेले.तेव्हा मात्र राष्ट्रवादीच्या पक्षफुटी बाबत काही लोकांना वाटले नाही.कारण घरवापसी लगेच झाली होती.परंतु आताची राजकीय परिस्थिती थोडीशी वेगळी असून



राष्ट्रवादी सध्या एका वेगळ्या राजकीय परिस्थितीतून जात आहेच.हे सत्य आहे.राजकारणात ती परिस्थिती उदभवली आहे की,तसे करण्याची वेळ आलेली आहे. याचे खरे वास्तव आज ना उद्या पुढे येईलच कारण ईडी,साहेबांचा आशीर्वाद,बंडखोरी आदी मुद्दे सुद्धा या पक्ष फुटीत चर्चिले जात आहेत.तसेही शरद पवार आणि त्यांचे राजकारण हे कसे असते.याचे गणित दुनियेला माहित झालेले आहे.सत्तेची सगळी सूत्रे हलविण्यात शरद पवार तरबेज असतात.परंतु

शरद पवारांकडे स्वतःच्या पक्षाची सत्ता मात्र एकहाती येत नाही.त्यासाठी काँग्रेस सोबत असावीच लागते.शरद पवार अणि त्यांचे राजकारण ते काय करतील हे सांगता येत नाही.जे असतं ते तसं नसतं. असा सुद्धा विचार शरद पवारांच्या राजकारणा बद्दल केला जातो.राष्ट्रवादी फुटी नंतर पक्ष दाव्याची भाषा पुढे आली.हे सुद्धा राजकारण जनतेला समजत आहे.जनता एकच म्हणते इथे सुद्धा साहेबांचाच आशीर्वाद असेल.

राष्ट्रवादी पक्षाच्या चुली दोन बनल्या.परंतु फिरवलेली भाकरी ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचीच आहे.पक्षातील अंतर्गत राजकारणाच्या खेळया जेव्हा चव्हाट्यावर येतात तेव्हा जे राजकारण गेल्या काही वर्षांत कसे केलेले असते.त्याचे परिणाम हे येणाऱ्या काळात राजकारणावर सकारात्मक आणि नकारात्मक सुद्धा पडत असतात.त्यानूसार सुद्धा रणनीती आखावी लागत असते.आज शरद पवार आणि अजित पवार यांच्या सोबत आमदार खासदार,कार्यकर्ते पदाधिकारी किती आहेत.याची आकडेवारी गणली जात आहे. शिवाय चाचपणी सुद्धा सभांमधून केली जात आहे. दोन्ही गटात विभाजन झाल्याने ते नेते कार्यकर्ते पदाधिकारी जरी हिकडे तिकडे पाहायला मिळाले तरी ते मनाने व शरीराने मात्र शरद पवारांनी निर्माण केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातच आहेत.राष्ट्रवादी शरद पवारांची,राष्ट्वादी अजित पवारांची हे दोन्ही म्हटले जाते.त्यामुळे हा राष्ट्रवादी पक्ष एकसंधच आहे. पक्ष फुटला याची भीती घेण्याची गरज काल ही नव्हती आजही नाही.

उद्याचं गणित सांगता येणार नाही.परंतु जोपर्यंत शरद पवार महाराष्ट्राच्या राजकारणात आहेत.

तोपर्यंत राष्ट्रवादी एकसंधच असलेली दिसेल.

राष्ट्रवादी पक्षाला गती देणारे राजकारण शरद पवार करत राहिले.राष्ट्रवादी ला मतांची जुळवा जुळव करण्यासाठी शरद पवारांची खेळी कायम एक पाउल पुढे टाकत राहते.अनेकांना क्लिन बोल्ड करणारे राजकारण शरद पवारांचे असते.जसे ते भाजप शिवसेनेच्या मैत्रीला ब्रेक देऊन महाविकास आघाडीचे शिल्पकार बनू शकतात तसेच ते भाजपची मोट सुद्धा बांधू शकतात.राजकारणात काहीही घडू शकते सांगता येत नाही.अनेक राजकीय स्थित्यंतरे अचंबित आणि आश्चर्य करणारी असतात.राष्ट्रवादीचा आश्वासक चेहरा कोण असे जेव्हा पत्रकार विचारतात तेव्हा शरद पवारांचे एकच उत्तर येते ते म्हणजे शरद पवार.

आजही राष्ट्रवादी पक्ष आणि महाराष्ट्रातील राजकारण हे शरद पवारांच्या भोवतीच आहे.हे शरद पवारांनी दाखवून दिले.राज्यातील अनेक गावांतून सोसायटी,ग्रामपंचायती,जिल्हा परिषद,पंचायत समिती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकां मधून राष्ट्रवादीचा गजर केलेला आहे.पश्चिम महाराष्ट्र तर शरद पवार यांच्या साठी हक्काचेच आहे. साताऱ्यातील पावसात भिजत गाजविलेल्या सभेने अनेक तरुणांना प्रेरणा तर दिलीच शिवाय राजकीय ताकद निर्माण केली.राज्यातील राजकारणात सत्तेला आपल्या अवती भवती ठेवण्यासाठी शरद पवार कायम यशस्वी झाले.परंतु पक्षाची एकहाती सत्ता बहुमताच्या आकड्याने त्यांना आजपर्यंत मिळविता आलेली नाही.पक्ष अस्तित्वात आल्या पासून पक्ष वारंवार सत्तेत येत गेला.महाविकास आघाडीच्या प्रयोगात काँग्रेस,शिवसेना,राष्ट्रवादी एकत्र आली.परंतु शिवसेनेच्या पक्ष फुटीने पक्ष फुटने,पक्षावरील दावा हे नव्याने महाराष्ट्राच्या राजकारनाने पाहिले.राष्ट्रवादीला काँग्रेस सोबतची व एका विचारधारेची आघाडी टिकवून ठेवण्यात कायम सफलता मिळत गेली.तरी ही ज्या शरद पवारांचा राजकारणात मोठा दबदबा आहे.त्या शरद पवारांना राष्ट्रवादी पक्षाची बहुमताच्या आकड्याने सत्ता मिळविता आली नाही.

आजही एकहाती सत्तेपासून शरद पवार वंचितच आहेत.शरद पवारांची पावर,राष्ट्रवादी पक्ष

विधानसभा निवडणुकीतून स्व पक्षीय

बहुमताच्या आकडयाने कधी सत्तेवर येणार ? हा सवाल उपस्थित राहिले तरी आजच्या

पक्ष फुटीच्या राजकारणात ज्या पद्धतीने राजकारण घडत आहे.त्या राजकारणाकडे पाहिले तर मतदारांच्या समोर मता साठी जाताना संघर्ष करावा लागणार आहे. हे नक्की...

# वीस कलमी कार्यक्रम : कल्पना कुणाची ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**वि.स.पागेंची रोजगार हमी योजना ही एकमात्र कल्पना होती असे नाही, तर तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी राबविलेला वीस कलमी कार्यक्रम ही कल्पना पागेंचीच होती. इंदिराजींनी त्यांना दिल्लीला बोलावून घेतले. त्यांनी एकांतात पागे यांच्याकडून या नामी कल्पना ऐकून समजून घेतल्या. त्यानंतर ही वीस कलमी कार्यक्रमांची कल्पना पंतप्रधानांचीच असल्याचे सांगण्यास बाध्य केले. इतरत्र याची वाच्यता न करण्याचेही पागेंना सांगण्यात आले, असे आपल्या वाचनात आले आहे.**

स्वातंत्र्यसैनिक, रोजगार हमी योजनेचे जनक, महाराष्ट्राच्या विधानपरिषदेचे माजी सभापती, साहित्यिक, कवी व नाटककार

वि. स. पागे यांची आज जयंती. त्यांचे पूर्ण नाव विठ्ठल सखाराम पागे. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील बागणी येथे दि.२१ जुलै १९१० रोजी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण तासगाव येथे झाले. ते सातव्या इयत्तेत पहिले आले होते. त्यानंतर ते संस्कृत विषय घेऊन बीए झाले. त्यानंतर त्यांनी एलएलबी ही कायद्याची पदवी घेतली. लहानपणापासूनच त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता. वाळवा हा तालुका क्रांतिकारकांचा तालुका म्हणून ओळखला जातो. सन १९३०ची कायदेभंगाची चळवळ तसेच सन १९४२चे भारत छोडो आंदोलन यांमध्ये त्यांनी भाग घेतला होता. त्यांनी तुरुंगवासही भोगला होता. स्वातंत्र्यानंतर वर्ष १९५२ ते १९६० या कालावधीत ते विधान परिषदेचे सदस्य झाले. त्यानंतर वर्ष १९६० ते १९७८ सुमारे अठरा वर्षे एवढ्या प्रदीर्घ कालावधीसाठी विधान परिषदेचे अध्यक्ष होते.

अत्यंत संयमी, शांत असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. रोजगार हमी योजनेच्या कल्पनेबद्दल एक गोष्ट सांगितली जाते. महाराष्ट्रात साधारण १९७१ ते १९७४ या कालावधीमध्ये दुष्काळ पडला होता. त्यावेळी शेतकरी




व कामकरी यांची परिस्थिती गंभीर झाली होती. दुष्काळाच्या या परिस्थितीचा विचार करीत ते एकदा आपल्या घरी झोपाळ्यावर बसले होते. त्यांनी त्यांच्या पत्नीला विचारले, "प्रभा, घरात पैसे किती आहेत?" प्रभाताईंनी सांगितले, की सातशे रुपये आहेत. त्यावर त्यांनी विचारणा केली, की सातशे रुपयांत शेतावर किती गडी राबू शकतील? घरातून सांगण्यात आले, की वीस दिवस चौदा-पंधरा गडी सहज लावता येतील. मग काय त्यांनी थेट मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनाच पत्र लिहायला घेतले. त्यातील मजकूर असा होता- "माननीय मुख्यमंत्री साहेब, माझ्या शेतावर सातशे रुपयांत चौदा-पंधरा दिवस वीस गडी मजुरीला लावता आले. शंभर कोटी रुपये बाजूला काढलेत, तर किती मजुरांना काम देता येईल?" रोजगार हमी योजनेचा जन्म या चार ओळींमध्ये झाला. वसंतराव नाईक यांनी लगेचच पागे यांना बोलावून घेतले. नेमकं काय करायला हवं ते सगळं विचारून घेतलं. योजना फारच छान होती. पण शंभर कोटी रुपये कुठून आणायचे? या प्रश्नाने मुख्यमंत्री चिंतेत पडले. त्यावेळी शंभर कोटी रुपये खूप मोठी रक्कम होती. त्यांनी या विषयावर विरोधी पक्षनेत्यांसह खास बैठक बोलावली. या बैठकीत त्यावेळचे विधानसभेतले विरोधी पक्षनेते कृष्णराव धुळप उपस्थित होते. ते म्हणाले, की नाईकसाहेब, गरिबांना काम देत असाल तर या योजनेसाठी शंभर कोटी रुपये उभे करण्यास विधानसभेत आम्ही कर प्रस्ताव घेऊन येतो. जगाच्या संसदीय लोकशाही इतिहासात पहिल्यांदाच सत्ताधारी पक्षाला संपूर्णपणे मदत करण्यासाठी कर प्रस्ताव आणण्याची भूमिका सर्वप्रथम महाराष्ट्रातच घेतली गेली.

वि.स.पागेंची रोजगार हमी योजना ही एकमात्र कल्पना होती असे नाही, तर तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी राबविलेला वीस कलमी कार्यक्रम ही कल्पना पागेंचीच होती. इंदिराजींनी त्यांना दिल्लीला बोलावून घेतले. त्यांनी एकांतात पागे यांच्याकडून या नामी कल्पना ऐकून समजून घेतल्या. त्यानंतर ही वीस कलमी कार्यक्रमांची कल्पना पंतप्रधानांचीच असल्याचे सांगण्यास बाध्य केले. इतरत्र याची वाच्यता न करण्याचेही पागेंना सांगण्यात आले, असे आपल्या वाचनात आले आहे. पागे हे कवी, नाटककार होते. त्यांचे पहाटेची नौबत आणि अमरपक्षी या नावाचे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी वीर मोहन नावाचे नाटक लिहिले होते. तसेच निवडणुकीचा नारळ नावाची नाटिका लिहिली होती. तुका म्हणे जाऊ वैकुंठा चालत हे संगीत नाटक त्यांनी लिहिले. पागे व नाईक दोघेही ग्रामीण भागातील असल्याने त्यांना शेतकरी व कामकरी यांच्या प्रश्नांची चांगली जाण असल्यामुळे रोजगारनिर्मिती व त्यातून विकास साधण्याची खरी प्रक्रिया सुरू झाली. रस्ते, पाझर तलाव, नाला बंडिंग, विहिरी अशा प्रकारची कामे सुरू झाली. अशातच दि.१६ मार्च १९९० रोजी विठ्ठल स. पागे यांचे निधन झाले.

# आयुष्य सजवू या...

आधुनिक केसरी

कधी कोणाच्या आयुष्यात काय होईल आणि कसा आणि कुठे कुणाचा शेवट होईल हे कोणालाच सांगता येत नाही. इतकं हे आयुष्य क्षणभंगूर आहे.आयुष्य पुन्हा नाही.म्हणून माणसाने राग,द्वेष ,हेवा आणि मत्सर याला मूठमाती देऊन आपल्या आयुष्यात वाट्याला येणारा प्रत्येक क्षण छान आणि आनंदी कसा जाईल याचा विचार करुन हे आयुष्य जगलं पाहिजे. माणूस म्हटले वेगवेगळी स्वभाववैशिष्ट्ये, मतभेद आणि मतभिन्नता आलीच. त्याला आपण काही करु शकत नाही. मात्र स्वतःमध्ये बदल करुन आपलं आयुष्य छान कसं जगता येईल याचा आपण प्रयत्न करु शकतो.

पद पैसा आणि प्रतिष्ठा शेवटी काही राहत नाही.ज्यादिवशी तुमचा अंत होतो. त्याचदिवशी तुम्ही या दुनियेतून संपता.बाकी सगळे सोपस्कर आणि औपचारिकता असते. माणसाने समंजसपणे इतरांशी जुळवून घेऊन सगळ्यांच्या सोबतीने आयुष्य जगण्यात जी मजा आहे ना ती कशातच नाही. आपल्याकडे सगळं काही असताना रक्ताच्या नात्याची माणसं जवळ नसताना या जगातून एक्झिट घेणं यासारखे दुदैव नाही.म्हणून माणसाने मतभेद असले तरी ते एका मर्यादेच्या पलीकडे जाऊ नयेत याची दक्षता घेतली पाहिजे.

एकमेकांशी जुळवून घेऊन नाती जपली पाहिजेत. ज्या दिवशी तुम्ही या जगातून जाता त्याच दिवशी तुमची ओळख संपते. तुम्ही शून्य बनता.आणि मागे उरतात फक्त चांगल्या अथवा वाईट आठवणी. आपले जीवन सुंदर बनविणं आपल्याच हातात आहे. त्यासाठी आपलकी, प्रेम, स्नेह आणि जिव्हाळा या मूल्यांना सोबत घेऊन जगलं नाहीतर मानवी जीवन अपूर्ण आहे.

आज आपण पाहतोय माणसातला अहंकार नात्यात दुरावा ठरतोय. मीच का माघार घेऊ, माझे काय अडलय अशी जर भूमिका



घेतली तर तुम्ही जीवनातील आनंद गमावून बसाल. कुणीतरी दोन पावले मागे सरले तर मनोमिलन होते. वैयक्तिक मतभिन्नता असू शकते. अडीअडचणीला एकत्र येऊन पुढे जाता येते. यासाठी हदयात विशालता हवी.मी आणि माझे सोडून द्यायला हवे. एकमेकांची सुख दुःखे वाटून घेण्यात खूप आनंद असतो. तुमच्याजवळ काही नसले तरी चालेल पण हक्काची आणि प्रेमाची चार माणसे जवळ असतील तर तुम्ही कितीही मोठ्या संकटाचा धीराने मुकाबला करु शकता. त्यासाठी माणसे जोडायला हवीत.आणि त्यांना जपयलाही हवं.

एकमेकांची साथ माणसाला जगण्यास बळ देते. दुःखाच्या प्रसंगातून बाहेर पडायला मदत करते. तुम्ही अडचणीतून सहज तरुन जाता. ताठर भूमिका घेऊन तुम्ही एकटे पडू शकता. तुमचे जगणं निरस आणि कंटाळवाणे होईल. जीवनाबद्दल तुमचा आशावादी दृष्टिकोन नाहीसा होण्याची शक्यता बळावेल.

आयुष्य हे सुंदर आहे आणि ते आपल्या माणसांच्या साथ संगतीने आणखी सुंदर करणं आपल्याच हातात आहे.शेवटी तुम्ही जीवनाकडे कसे बघता यावर सर्व अवलंबून आहे.


लक्ष्मण जगताप

# शिक्षण विभाग व निवडणूक शाखेतील समन्वयाअभावी मुख्याध्यापकांना बीएलओचे नियुक्ती आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** मतदान केंद्रस्तरीय अधिकारी असलेल्या व बदली प्रक्रियेत इतरत्र बदलून गेलेल्या शिक्षकांच्या जागेवर नवीन मतदान केंद्रस्तरीय अधिकारी नेमतांना पंचायत समितीचा शिक्षण विभाग व तहसिल कार्यालयातील निवडणुक शाखा यांच्यातील असमन्वयाचा व अवमेळाचा फटका तालुक्यातील अनेक मुख्याध्यापकांना बसला आहे. अनेक प्रभारी मुख्याध्यापकांच्याच नियुक्त्या बीएलओ म्हणून करण्यात आल्याने आधीच अवांतर माहित्या व शालाबाह्य कामांनी त्रस्त असलेल्या प्रभारी मुख्याध्यापकांना शिक्षण विभाग व निवडणुक शाखेने वेठीस धरण्याचा प्रकार केला आहे.

जिल्हा परीषदेतील शिक्षकांची बदली प्रक्रीया मे महिन्यात पार पडली. त्यामध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकारी असलेल्या तालुक्यातील अनेक शिक्षकांच्या बदल्या इतरत्र झाल्या आहेत. अशा बदलून गेलेल्या ४७ बीएलओ शिक्षकांच्या जागी दुसरे शिक्षक नियुक्त करण्याचा आदेश नुकताच काढण्यात आला आहे. मात्र त्यामध्ये ज्या शिक्षकाची बदली झाली. त्या शिक्षकांच्या जागी बदलून आलेल्या शिक्षकास मतदान केंद्रस्तरीय अधिका-यांचे आदेश देणे आवश्यक होते. मात्र तहसिल कार्यालयातील निवडणुक शाखा व पंचायत समितीचा शिक्षण विभाग यांच्यात समन्वय नसल्याने त्याचा फटका अनेक प्रभारी मुख्याध्यापक व विशेषतः महिला शिक्षकांना बसला आहे.निवडणूक शाखेने फक्त बदलीत बीएलओ शिक्षकांच्या जागी बदलून आलेल्या शिक्षकांची माहिती मागितली असताना शिक्षण विभागाने कार्यरत इतर सर्वच शिक्षकांची माहिती दिली. त्यामुळे निवडणूक शाखेने देखील त्याची शहानिशा करता नेमणूकांचे आदेश दिले. त्यामुळे शालेय कामकाज,विविध माहित्या, मिटींग,समित्यांच्या बैठका,इतिवृत्त लेखन,आर्थिक अभिलेखे, प्रशिक्षण, ऑनलाईन कामे, शालेय पोषण आहार या कामाने आधीच त्रस्त असलेल्या मुख्याध्यापकांना अतिरिक्त ताण आला आहे. अनेक ठिकाणी शाळेवर कार्यरत एकमेव शिक्षकांना,पुरुष कर्मचारी असताना महिलांना देखील आदेश दिले आहेत.त्यामुळे या नियुक्त्या देतांना इतर पर्याय वापरण्यात यावेत. अशी मागणी शिक्षकांमधून होत आहे. इतर विभागाचे कर्मचारी देखील गावात उपलब्ध असतांना प्रत्येक वेळी शिक्षक व मुख्याध्यापक यांनाच निवडणुक शाखेकडून बळीचा बकरा बनवले जाते. त्यामध्ये विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. याबाबत प्रभारी मुख्याध्यापक व महिला शिक्षकांचे आदेश तातडीने बदलण्यात यावेत अन्यथा या कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा इशारा प्राथमिक शिक्षक बँकेचे संचालक रमेश गोरे यांनी केली आहे.



१ ) बदलून गेलेल्या बीएलओ शिक्षकांच्या जागी बदलून आलेल्या शिक्षकांची यादी पंचायत समितीच्या शिक्षण विभागाकडे मागवली होती . मात्र त्यामध्ये कोणत्या कोणत्या प्रवर्गातील शिक्षकांची नावे व प्रभारी मुख्याध्यापकांची नावे आहेत याबाबत माहिती नाही . शिक्षण विभागाने यादी दुरुस्त करुन पाठवल्यास सुधारीत आदेश काढण्यात येतील . **रविंद्र सानप – नायब तहसिलदार निवडणुक शाखा**

२ ) निवडणुक शाखेने बीएलओ शिक्षक असलेल्या शाळेतील कार्यरत असलेल्या शिक्षकांची यादी मागवली होती . त्यामध्ये कार्यरत असलेल्या सर्व शिक्षकांची नावे देण्यात आली . आदेश काढताना मुख्याध्यापक व इतर प्रभारी चार्ज असलेल्या शिक्षकांचे नावे वगळून सुधारीत यादी पाठवण्यात येईल .
**तृप्ती कोलते – गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती शेवगाव**

# संभाजी भिडेंच्या दौऱ्याला विरोध

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शिवप्रतिष्ठान हिंदूस्थान संस्थेचे संस्थापक संभाजी भिडे उद्या ( 20 जुलै ) रोजी औरंगाबाद दौऱ्यावर असणार असून, गंगापूर येथे आयोजित कार्यक्रमाला ते हजेरी लावणार आहेत. दरम्यान त्यांच्या याच दौऱ्याला आणि कार्यक्रमाला आता विरोध होताना पाहायला मिळत आहे. गंगापूर येथे उद्या होणाऱ्या संभाजीराव भिडे यांच्या कार्यक्रमाला परवनगी देऊ नयेत, अन्यथा हा कार्यक्रम उधळून लावण्याचा इशारा देण्यात आला आहे. याबाबत आंबेडकर अनुयायी आणि शहरवासियांच्या वतीने पोलिसांना निवेदन देण्यात आले आहे. विशेष म्हणजे यापूर्वी गेल्या आठवड्यात नांदेड जिल्ह्यात देखील भिडे यांना असाच विरोध करण्यात आला होता.

संभाजी भिडे उद्या गंगापूर येथे येणार आहेत. दरम्यान यावेळी शहरातील राधाकृष्ण मंगल कार्यालयामध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. मात्र गंगापुर शहरात कार्यक्रम झाल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल. देशाला व राष्ट्राला हानीकारक असणारे वक्तव्य करण्याचा हेतू आहे. त्यामुळे शहारातील व तालुक्यातील शांतता बिघडवण्याचे काम होण्याची दाट शक्यता असल्याचा दावा करत या कार्यक्रमाला परवानगी न देण्याचे निवेदन पोलिसांना देण्यात आले आहे. तसेच हा कार्यक्रम झाल्यास सभा आणि संबंधित कार्यक्रम उधळून लावण्याचा इशारा देखील यावेळी देण्यात आला आहे.



# जिल्हा प्रमुखांच्या उपस्थितीत प्रहार संघटनेची आढावा बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** प्रहार जनशक्ती पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, आदरणीय आ. बच्चूभाऊ कडू साहेब यांच्या सूचनेनुसार तसेच प्रदेशाध्यक्ष अणील गावंडे व महाराष्ट्र उत्तर प्रदेश अध्यक्ष अनिल भाऊ चौधरी यांच्या आदेशानुसार आज सिंचन गेस्ट हाऊस छत्रपती संभाजीनगर येथे आढावा बैठक घेतली हि बैठक माझी जिल्हाप्रमुख फेरनिवड झाल्यानंतर पहिलीच आढावा बैठक होती.

आज आढावा बैठक मध्ये तालुक्यातील आलेल्या सर्व कार्यकर्त्यांच्या भावना काही सुचना ऐकून घेतल्या तसेच येणाऱ्या दिवसांत प्रहार तालुका लेवल असेल सर्कल असेल याठिकाणी संघटन कसं मजबूत करता येईल यासाठी काही सुचना केल्या. खरं तर प्रहार हे आपलं कुटुंब आहे आणि या कुटुंबांत गटातटाचे राजकारण कोणी करणार यासाठी सुचना केल्या. तसेच येणाऱ्या काळातील निवडणुकांमध्ये आपण कसं मजबूतपणे भाग घेता येईल यासाठी सुचना केल्या आहेत. यासाठी सर्वांनी गावागावात शाखा उभा करण्यासाठी प्रयत्नशील असायचे आहे.

पुन्हा नव्याने आपण प्रहार पदाधिकारी निवड करणार आहोत. जिल्हा कार्यकारिणी असेल तालुक्यातील पदाधिकारी असेल यामध्ये ॲक्टिव पदाधिकारी असेल किंवा नवीन कोणी पक्षात काम करण्यासाठी इच्छुक असेल या सर्वांना विचारात घेऊनच त्यांना संधी दिली जाईल.

विशेष करून जिल्ह्यातील कोणत्याही कामा संदर्भात मग ते गाव लेवल काम असेल किंवा काही ठिकाणी आपल्याला आंदोलन उभा करायचं असेल हे सर्व प्रोटोकॉल नुसार आपण करणार आहोत छोट्या छोट्या गोष्टींसाठी डायरेक्ट साहेबांना त्रास देणं योग्य होणार यासाठी आपण सर्वजण खबरदारी घेऊ याबाबत सुद्धा सर्वांना सुचना केल्या.

# मुंबई-पुणे धावणाऱ्या महत्त्वाच्या अनेक रेल्वेगाड्या रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मुंबई- पुणे किंवा पुणे-मुंबई ट्रेनने प्रवास करणाऱ्यांसाठी महत्वाची बातमी आहे. मुंबई विभागात काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे मुंबई- पुणे किंवा पुणे-मुंबई दरम्यान धावणाऱ्या ट्रेन रद्द करण्यात आल्या आहेत. आज ( 19 जुलै ) आणि उद्या ( 20 जुलै ) या ट्रेन बंद असणार आहे. त्यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागणार आहे. यात डेक्कन क्विन, सिंहगड एक्सप्रेस, इंद्रायणी एक्सप्रेस, डेक्कन एक्सप्रेस आणि इंटरसिटी या पुणे - मुंबई धावणाऱ्या ट्रेनचा समावेश आहे. या ट्रेन पुणे मुंबई दररोजचा प्रवास करणाऱ्या नोकरदारवर्गासाठी महत्वाच्या आहेत. मात्र मुंबईत झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक परिसरातील रुळांवर पाणी साचल्यामुळे या ट्रेन रद्द करण्यात आल्याचं रेल्वे विभागाकडून सांगण्यात आलं आहे. 1) डेक्कन क्विन- 12123 सीएसएमटी-पुणे 19.7.23 आणि12124 पुणे-सीएसएमटी 20.7.23 2) सिंहगड एक्सप्रेस- सीएसएमटी -पुणे 19.07.23 आणि 11010 पुणे-ीएसएमटी20.07.23 3) डेक्कन एक्स्प्रेम- पुणे-सीएसएमटी 19.07.23 आणि 11007 सीएसएमटी-पुणे 20.07.23 4) इंटरसिटी- पुणे-सीएसएमटी 19.07.23 आणि 12127 सीएसएमटी-पुणे 20.07.23 5) इंद्रायणी- पुणे-सीएसएमटी 19.07.223 आणि 22105 सीएसएमटी-पुणे 20.07.23



# संत शिरोमणी सावता महाराज प्रतिमेची मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील संत सावता महाराज मंदिर माळी गल्ली च्या वतीने सोमवार( ता१७ )रोजी संत सावता महाराज यांच्या प्रतिमेची मिरवणूक भजन, टाळ, मृदुग वाजवून संकट मोचन मार्गे धुमाळ कार्यालय पर्यंत नेण्यात आली. या ठिकाणी नेण्यात आली, तेथे ह.भ.प. पांडुरंग महाराज उगले परभणीकर यांचे कीर्तन झाले. या प्रसंगी काशीनाथ शेठ गायकवाड, विनोद गायकवाड व धोंडीरामसिंह राजपूत, डॉ. सुभाष भोपळे, बाबासाहेब गायकवाड, सौ. सुलभा भोपळे, सौ. पवार श्रीमती जिजाबाई गायकवाड यांची या प्रसंगी प्रमुख उपस्थिती होती. संतोष गायकवाड, शशिकांत भालेराव, भरत गायकवाड, शांतीलाल पवार, पुंडलिक गायकवाड, प्रमोद राऊत, गोकुळ पेहरकर, हभप डंबिर महाराज, यशवंत गायकवाड,रतीलाल गायकवाड यांनी सहभाग नोंदविला.

# वडारवाडी परिसरात पथदिवे बसवा; शहर प्रमुख दीपक हिवाळे

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** शहरातील वडारवाडी व नागसेन नगर परिसरात अंतर्गत रस्ते मध्ये पथदिवे स्क्रीन लाईट बसवा असे निवेदन मुख्याधिकारी नगरपरिषद परतुर यांना शिवसेना शहरप्रमुख दीपक हिवाळे यांच्यासह वडारवाडी व नागसेन नगर परिसरातील रहीवाश्यांनी दिले आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, वडारवाडी व नागसेन नगर परिसरात अंर्तगत रस्ते असून थ्री फेज विद्युत कनेक्शन विद्युत खांबावर आहे.त्यावर नगरपरिषद मार्फत आद्यप एकही सरकारमधील पथदिवा स्ट्रीट लाईट बसलेला नाही वडारवाडी परिसरातील नागरिक हे घरपट्टी धारक असून त्यांना नगरपरिषद मार्फत कुठल्याही सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत संध्याकाळी रात्रीच्या वेळी सर्वत्र अंधार पसरलेला असतो चोर व इतर प्राण घातक जनावरामुळे नागरिकांच्या जीविकास धोका होऊ शकतो सध्या पावसाळ्याचे दिवस असून चिखलाचे व घाणीचे साम्राज्य असल्यामुळे



स्ट्रीट लाईट पथदिवा असणे आवश्यक आहे. म्विद्युत खांबावर नगरपरिषदेने पथदिवे स्ट्रीट लाईट बसवावे अशी मागणी शिवसेना शहर प्रमुख दीपक हिवाळे यांच्यासह साहेबराव रामा पवार, बापुराव तुळशीराम शिंदे, विठ्ठल सावळा पवार, अनिल साहेबराव पवार, लखन मारुती हिवाळे, विलास गंगाराम जाधव अशोक बन्सी पहाडे, शेख रशीद एकनाथ घोडे व आदी परिसरातील रहीवाश्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.





# सार्वजनिक बांधकाम विभागाकडून विकासकामाची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** नगरपंचायत हद्दीत फुलंब्री नगरपंचायत हद्दीत सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन होणाऱ्या सिमेंट कॉंक्रीट रस्ता, लादीकरण आर सी सी खडीकरणअशा एकुण 05 विकास कामे हे निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत मा. विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे कार्यालयासमोर दि. 21/06/2023 रोजी आमरण उपोषण करण्यात आले.त्याअनुषंगाने डॉ. नीलम पाटील सहा. आयुक्त गट-अ नगरपरिषद प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी मी नमूद केलेल्या तक्रारीमधील मुद्यांची शहानिशा करून माझ्या तक्रारीचे निराकरण सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून करण्यात यावे असे पत्र द्वारे सांगितले होते त्याअनुषंगाने आज उपविभागीय अभियंता राजकुमार हेलाले व कनिष्ठ अभियंता पारधी यांनी 05 बोगस विकास कामांची पाहणी करुन आवश्यक सुधारणा करणे व कामेअंदाजपत्रकानुसार झाल्याबाबतची खात्री करण्यासाठी पाहणी केली. तसेच मला सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फुलंब्री यांचे कार्यालयामार्फत तक्रारीची मुद्देनिहाय माहिती / अहवाल देण्यात येईल. सदर विकास कामांची 03 वर्षे देखभाल दुरुस्ती सार्वजनिक उपविभाग बांधकाम कार्यालयामार्फत करण्यात येईल.असे यावेळी सांगितले.

# पोलीस उपनिरीक्षकाचा महिलेवर अत्याचार

आधुनिक केसरी न्यूज

**राहुरी :**पोलीस स्टेशनच्या अंतर्गत हा प्रकार घडला आहे. राहुरी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार अर्ज दाखल करण्यासाठी आलेल्या महिलेवरच येथील पोलीस उपनिरीक्षकाने अत्याचार केल्याची संतापजनक घटना घडली आहे. राहुरी पोलीस स्टेशनचे पीएसआय सज्जनकुमार नऱ्हेडा यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिला जमीन खरेदीत फसवणूक झाल्याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यासाठी आल्या असता, यानंतर अनेकदा संबंधित पीएसआयने व्हॉट्सॲपवर धमकी देत अत्याचार केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. सदर पोलीस उपनिरीक्षक सध्या फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.



# भाजप नेते किरीट सोमय्या विरोधात उरण शिवसेना महिला आघाडी आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** भारतीय जनता पार्टीचे नेते किरीट सोमय्या यांचे लोकशाही टीव्हीने जे पोलखेल करून वादग्रस्त व्हिडिओ महाराष्ट्राच्या जनते समोर आणले आहेत त्या विरोधात संपूर्ण महाराष्ट्रात महिलांमध्ये जनोक्रोश निर्माण झालेले आहे, आणि त्याचाच भाग म्हणून शिवसेना उरण तालुका व शहराच्या महिला आघाडीच्या वतीने जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहरशेठ भोईर, उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर,गटनेते गणेश शिंदे व उपजिल्हा संघटिका ममता पाटील यांच्या नेतृत्वाखाली उरण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांना निवेदन सादर करून पुढील कारवाई करण्याची विनंती केली आहे. सदर वेळी महिला आघाडीच्या तालुका संघटिका भावना म्हात्रे, विधानसभा संघटिका ज्योती म्हात्रे, शहर संघटिका मेघा मेस्त्री, शहर संपर्क संघटिका वंदना पवार, उपतालुका संघटिका मनीषा ठाकूर, अल्पसंख्यांक सेलच्या शहराध्यक्ष मुमताज भाटकर, तालुका उपाध्यक्ष रुबीना कुट्टी, विभाग संघटिका रूपा सिंग, महिला आघाडीच्या पदाधिकारी जागृती घरत, हसीमा सरदार, मालिनी वायदांडे, मानसी पुरो, सुनीता गाडे, रश्मी घरत,रूपा पवार, कल्पना थळी, मा शहर संघटक महेश वर्तक, सम्राट घरत व कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# वीजपुरवठा खंडित केला म्हणून कंत्राटी कर्मचाऱ्यास मारहाण; दोघांवर गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** नूतन कॉलनीजवळच्या बडा तकिया येथे थकबाकीदाराचा वीजपुरवठा खंडित केला म्हणून दोघांनी महावितरणच्या कंत्राटी कर्मचाऱ्यास मारहाण करून विद्युत सहायकास जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी दोघांवर क्रांती चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महावितरणच्या क्रांती चौक शाखा कार्यालयात काम काम करणारे विद्युत सहायक ऋषीकेश केरे व बाह्यस्रोत कंत्राटी कर्मचारी फैसल मकरानी हे मंगळवारी ( 18 जुलै ) दुपारी 12 वाजता थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यासाठी बडा तकिया परिसरात गेले होते. करीम महेबूब या ग्राहकाकडे वीजबिलाची 13 हजार रुपये थकबाकी असल्याने विद्युत खांबावरून विद्युतपुरवठा खंडित केला. या ठिकाणी वीजवापर करणाऱ्या आलीम हरून कुरेशी व एका अनोळखी व्यक्तीने आमचा वीजपुरवठा खंडित का केला म्हणत मकरानी यांना शिविगाळ करून लाथाबुक्क्यांनी



मारहाण केली. तसेच केरे यांनाही शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. मारहाणीत जखमी झालेले मकरानी यांनी घाटी रुग्णालयात उपचार घेऊन क्रांती चौक पोलिस ठाणे गाठले. त्यांच्या फिर्यादीवरून आरोपी आलीम हरून कुरेशी व अनोळखी इसमावर सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी भारतीय दंड विधानाच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# शांतारामध्ये अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन शांताराई प्राथमिक , माध्यमिक व कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय ताजनापुर ता.खुलताबाद येथील संस्थेच्या वतीने , लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची पुण्यतिथी साजरी करतांना , प्राचार्य गणेश काळे प्रा .सुनील इनामदार , कोमल इंगळे मॅडम प्रत्यक्ष आहेर . बहुरे मॅडम . अतुल गुळवे भगवान साळुंखे किरण काळे शिक्षक कल्पना काळे उपस्थित होते.



# फुलंब्री न.पं.मध्ये अण्णा भाऊ साठे पुण्यतिथी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** नगरपंचायत कार्यालय येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी योगेश पेटारे पोलीस पाटील विजय पठारे डॉ. विजय शेजवळ, विकी शेजवळ ब. यू. आघाडी तालुका महासचिव विनोद कसारे भारतीय दलित संसदेचे प्रवक्ते कचरू उमप सुभाष शेजवळ सुरज जगदाने विजय पवार व समाज बांधवांची उपस्थिती होती.

# एसपी संजय बारकुंड यांचा मोठा निर्णय; स्थानिक गुन्हे शाखेची सूत्रे घेतली

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पोलीस अधीक्षक संजय बारकुंड



यांनी तात्काळ पत्रकार परिषद घेऊन एक मोठा निर्णय बाबत माहिती देण्यात आली आहे काही दिवसांपूर्वी आय.जी च्या पथकाने कारवाई केल्याने एसपी यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या कामकाजावर मोठा प्रश्न उपस्थित केला आहे . व स्थानिक गुन्हे शाखेचे सर्व कामकाज ते स्वतः सांभाळणार आहेत व आज पासून सर्व अवैध धंदे बंद म्हणजे बंद असे आवाहनही करण्यात आले आहे. ज्यांच्या हद्दीत अव्यय धंदे सुरू असतील त्यांच्यावर कडक कारवाई होईल असा इशारा संजय बारकुंड यांनी दिला आहे. आपल्या परिसरात कोणत्याही ठिकाणी कोणत्याही स्वरूपाचे अवैध धंदे बेकायदेशीर कृत्य सुरू असेल तर त्याची माझ्या भ्रमणध्वनीवर कळवावी कारवाही होईलच असा विश्वास देताना एसपी बारकुंड यांनी धुळेकरांना जिल्हाभरातील रहिवाशांना सुज्ञ नागरिकांना आवाहन केले आहे.दरम्यान पोलीस दलात भाकरी फिरवण्याचा निर्णय एसपी या आधीच घेतला असला तरी आज तडपा तडपी एलसीबी ची सूत्रे आपल्या ताब्यात घेतले आहे त्यामुळे सध्या एलसीबीची सूत्रे त्यांच्या हाती होती ते पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांची बदली नियंत्रण कक्षात करण्याचा आल्याची माहिती एसपींनी पत्रकार परिषदेत दिली.

मोराणे गावच्या शेजारी एका जुगार अड्ड्यावर छापा टाकून दीड लाखाची रोकड 25 मोटरसायकली तीन कार 31 जणांना ताब्यात घेतले होते या कारवाही नंतर धुळे जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे खपवून घेतले जाणार नाहीत ज्या पोलीस ठाण्यात हद्दीत अवेध धंदे सुरु असतील तेथील अधिकारी कर्मचाऱ्यांना कठोर कारवाई केली जाईल असा इशाराही दिला अवैध धंदे बाबत माहिती द्यावी असे जनतेला एसपींनी आवाहन केले आहे एलसीबी पोलीस निरीक्षकांची बदली का केली असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता एलसीबी चे कार्यक्षेत्र संपूर्ण जिल्हाभर असते ज्या ठिकाणी आयजी च्या पथकाने कारवाई केली तो भाग तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत येतो परंतु अगदी दोन-चार दिवसांपूर्वी येथील पोलीस निरीक्षक रुजू झाल्याने त्यांच्यावर कारवाई केली नसल्याने एस पी ने स्पष्ट केले आहे. व अशा निर्णयाने इतर माहिती समोर आल्याने पत्रकार व संपूर्ण धुळेकर जनतेच्या मनात पोलिसांच्या बाबतीत वेगळे चित्र दिसून आले आहेत. व यापुढे एसपी संजय बारकुंड मोठ्या ताकतीने संपूर्ण धुळे जिल्ह्यात कारवाई करतील असे आश्वासनही देण्यात आले आहे.



# तरडगाव शाळेस महानुभाव आश्रमाकडून सर्वज्ञ ग्रंथ भेट

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**तरडगाव :** ता.फलटण येथील श्री.ब्रह्मविद्या पाठशाळा,महानुभाव आश्रम यांच्या वतीने सौ.वेणूताई चव्हाण हायस्कूल मध्ये महानुभाव पंथाचे संस्थापक सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचे जीवनचरित्र प्रकाशमान करणारा महत्वपूर्ण सर्वज्ञ हा ग्रंथ महानुभाव पंथाचे नितीनराज बांधकर, निलेशराज डोळसकर, युगंधर राहेरकर यासाधकांच्या हस्ते मुख्याध्यापक सुनील पाटील यांच्याकडे सुपूर्द करत वाचनालयास भेट देण्यात आला.यावेळी "ज्ञानतेज महानुभाव पंथ"स्थूल दर्शन विशेषांक ही पुस्तिका शिक्षकवृंद यांना तसेच सन्मान लेखणीचा... अभिमान पत्रकारितेचा... ही भावना लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाबद्दल जपत पत्रकारांना सन्मानपत्र देऊनपत्रकारांच्या पत्रकारितेची दखल घेण्यात आली.यावेळीमुख्याध्यापक सुनील पाटीलपर्यवेक्षक विठ्ठल माने,माजी मुख्याध्यापक बाळासाहेब काटकर व सर्व शिक्षक उपस्थित होते.या भेटी बद्दल सुनील पाटील यांनी महानुभाव आश्रमच्या या उपक्रमाबद्दल विशेष धन्यवाद दिले.शाळेतीलएस. व्ही.क्षीरसागर,जे.डी.शिंदे, एस.टी.तांबे, पी.आर. ढोले, एस.जी.डांगे, एच.एस. आतार, एस.एस. देशपांडे, एच.एस.रणवरे, आर.डी.गलियल, के.जी.गावित, एस.बी.वळवी,सी.व्ही.गायकवाड, बी.बी.जाधव आदी शिक्षकवृंद ग्रंथपाल एस.ए.खलाटे,लिपिक एस.बी.वाघमारे आदींनामहानुभाव पंथ ज्ञानतेज ही पुस्तिका वपत्रकार बांधव यांच्या पत्रकारितेची दखल घेताना पत्रकार सचिन गायकवाड, अमोल काकडे, सुशिल गायकवाड यांना आश्रमातील साधकांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळीनितीनराज बांधकर ( नागपूर ) मनोगत व्यक्त करताना म्हटले की, सर्वज्ञांचे कार्य समाजातील प्रत्येक घटकाला उपयुक्त असून स्थितप्रज्ञ व त्यागमय



जीवन जाण्यासाठी सर्वज्ञांचे विचार आदर्शवत ठरतात व जीवनाला स्थिरता प्राप्त होते. पंचकृष्णांची भक्ती करणाऱ्या महानुभाव पंथाला लीळाचरित्ररुपी ग्रंथाचा परिसस्पर्श लाभला असून प्रामुख्याने या ग्रंथातून मराठी भाषेचा पुरस्कार केला आहे. मुख्याध्यापक सुनील पाटील म्हणाले की, ब्रह्मविद्या पाठशाळा संस्था व सौ.वेणूताई हायस्कूल तरडगाव हे दोन्ही ज्ञानमंदिरे कौशल्यपूर्ण विद्यार्थी घडवून समाजाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जात आहेत. महानुभाव पंथाची आचारप्रणाली ही अत्यंत शिस्तबद्ध असून स्वामींची कृतीशील विचारधारा ही भारतीय संस्कृतीचे संरक्षण करते.निखिलराज डोळसकर म्हणाले की,सर्वज्ञांचा विचारांचा जागर या उपक्रमातून आपण सर्वांनी स्वामींचे ही चरित्र वाचन करुन चिंतन करावे व आपल्या ध्येयाकडे वाटचाल करताना सर्वज्ञांचा विचार आत्मसात करुन आपले यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करावे.महानुभाव पंथ धर्मप्रसार माध्यमाचे प्रमुख युगंधर राहेरकर यांनी आभार व्यक्त केले.



# अण्णा भाऊ साठे यांना स्मृतिदिनी अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** दि.१८ जुलै रोजी महाराष्ट्र राज्याच्या विविध ठिकाणी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित केले जातात.याप्रमाणे डॉ.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त बिडकिन येथील लोशाहीर अण्णा भाऊ साठे चौक येथे विनम्र अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामपंचायत सदस्य रमेश शिंदे, अंकुश अवचिंदे, किशोर अवचिंदे, भरत मोघे, जालिंदर गायकवाड, शाम पाटोळे, संदिप शिंदे, अनिल शिंदे आदींसह बिडकिन व परिसरातील समाजबांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित लावली होती.

# संविधानाने पोलिस निरीक्षक बिपिन सांडभोर यांचा सत्कार

## अमोल साबळे यांच्या संकल्पनेतून अनोखा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** जेजुरी पोलिस स्टेशन ला नुतन पोलिस निरीक्षक म्हणून बिपिन सांडभोर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या नियुक्तीबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे स्वागत केले जात असून समाजास एक चांगला आणि प्रेरणादायी व आदर्श वाटणाऱ्या एका अनोख्या सत्काराने पोलिस निरीक्षक बिपिन सांडभोर यांचे स्वागत करण्यात आले.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पुणे जिल्हा युवा उपाध्यक्ष अमोल साबळे यांच्या संकल्पनेतून पोलिस निरीक्षक बिपिन सांडभोर यांना भारतीय संविधानाची उद्देशिका प्रत देण्यात आली. तसेच गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता ? हे पुस्तक सप्रेम भेट देण्यात आले.भारतीय संविधान व त्या संविधानातील मूल्य यांचा प्रचार आणि प्रसार करण्याचा प्रयत्न केला जात आहे.हा सत्कार करत असताना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पुणे जिल्हा युवा उपाध्यक्ष अमोल साबळे,पुणे जिल्हा सल्लागार नानासाहेब हेंद्रे, खंडाळा तालुकाध्यक्ष पवन धायगुडे पाटील, केंद्रीय पत्रकार संघ मंडलाधिकारी अनिल केदारी तसेच अपंग संघटनेचे अनिल मेमाणे आदी उपस्थित होते.

अमोल साबळे गेली अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात असून भारतीय संविधान जन जागृतीचे काम करत आहेत. या उपक्रमा बद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांना विशेष कौतुक वाटत असते. भारतीय संविधान उद्देशिका आणि शिवाजी कोण होता ? हे पुस्तक देऊन सत्कार केल्या बद्दल पोलिस निरीक्षक बिपिन सांडभोर यांनी सुद्धा विशेष धन्यवाद दिले आहेत.



# स्वा. सावरकर कनिष्ठ महाविद्यालयात 11वी विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित स्वा. सावरकर कनिष्ठ महाविद्यालय बीड मध्ये इ 11वी वर्गात विविध शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. प्राचार्य विजेंद्र चौधरी यानी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, या महाविद्यालयातील विविध उपक्रम सांगितले तसेच ही दोन वर्ष महत्वाची आहेत विद्यालयातील नियमांची माहिती दिली बीड शहरातील हे विद्यालय दोन वर्षात परिपुर्ण तयारी विद्यार्थ्यांची करुन घेते अनुभवी तज्ञ अध्यापक वर्ग यांचे मार्गदर्शन आपणास मिळणार आहे या विद्यालयात आपले हार्दिक स्वागत प्रा बाळासाहेब साळवे यानी विद्यालयात मिळणाऱ्या विविध शासकीय योजना, शिष्यवृत्ती या विषयी माहिती दिली व




सर्वाचे स्वागत. ( सर्व विद्यार्थ्याचे फाईल व गुलाब पुष्प देउन स्वागत करण्यात आले ) प्रमुख अतिथी अमोल कुलकर्णी यानी सांगितले या संस्कार केंद्राचा मी विद्यार्थी आहे येथे मिळालेल्या शिक्षणातून मी घडलो व माझा स्वतःचा व्यवसाय करतो तुम्हीही विविध क्षेत्रात येथुन शिक्षण घेवुन जाल तुम्हास हार्दिक शुभेच्छा. यावेळी कार्यक्रमाध्यक्ष प्राचार्य विजेंद्र चौधरी प्रमुख अतिथी अमोल कुलकर्णी, विभागप्रमुख प्रा बाळासाहेब साळवे प्रा डॉ दीपक देशमुख उपस्थिती होती .या कार्यक्रमाचे सुत्र संचलन प्रा रत्नमाला सोनवणे व आभार प्रा अंजली देशमुख यांनी केले. कल्याण मंत्र प्रा संतोष जोशी यांनी सांगितला. वरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक वृंदानी सहकार्य केले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# डॉ.नागेश लखमावार यांची परभणी येथे जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून पदोन्नती

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** नगरपरिषद क्षेत्रातील रत्नाळी येथील गरीब कुटुंबातील वडील शेतकरी असलेले रहिवाशी तथा बिलोली येथे सर्वोत्कृष्ट सेवा बजावणारे ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नागेश लखमावार यांची परभणी येथील जिल्हा रुग्णालयात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ सुहास जगताप सेवानिवृत्त झाल्यावर रिक्त असलेल्या जिल्हा शल्य चिकित्सक पदी डॉ.नागेश लखमावार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

बुधवार दिनांक 19 जुलै रोजी जिल्हा रुग्णालयात पदभार घेऊन रुजू झाले आहे. परभणी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास जगताप हे 31 मे रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर सदरील जागा रिक्त असल्याने जिल्हा रुग्णालयातीलच डॉ. अशोक बन यांच्याकडे प्रभारी जिल्हा चिकित्सक पदाचा पदभार देण्यात आली.व या पदासाठी अनेकांनी गुडघ्याला बाशिंग बांधून ठेवले



होते आपापल्या परीने याकरिता फिल्डिंगही लावण्यात आली होती यातच शासनाने सोमवार दिनांक 17 जुलै रोजी काढलेल्या पत्रात नांदेड जिल्ह्यातील बिलोली येथील रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.नागेश लखमावार यांची जिल्हा शल्य चिकित्सक पदी नियुक्ती झाल्याचे पत्र नुकतेच काढले आहे धर्माबाद येथील सर्व जाती धर्मात मित्रत्व जोपासणारे व्यक्तिमत्व म्हणून सुपरिचित असलेले बिलोली ग्रामीण रुग्णालयाला शिस्त लावून रोग निदान करोना काळात महामारी सारखी उपचार अनेक लोकांना जीवदान मिळवून दिली व रुग्णांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण करणारे डॉ.म्हणून नागेश लखमावार यांची बिलोली तालुक्यात ओळख व ख्याती आहे.

उपरोक्त पदोन्नतीमुळे धर्माबादचे उद्योजक व नांदेड जिल्ह्याचे व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष सुबोधजी काकांनी . मा. नगराध्यक्ष विश्वनाथ पाटील बन्नाळीकर .राम पाटील बाळापुरकर मा. नगराध्यक्ष विनायकराव देशमुख मा. नगराध्यक्ष दिगंबर लखमावार ग्रामीण रुग्णालयाचे रुग्ण कल्याण समितीचे सदस्य तथा बाजार समितीचे संचालक रमेश गौड, पत्रकार संजय कदम, प्राध्यापक रामचंद्र धावणे, मन्मत आप्पा स्वामी . गोविंद झंवर. डॉ. पडगिलवार. राजेश जाकापूरे. हरीश मांजरमकर.
डॉ लोलापोड संजीव. कृष्णा तिम्मापुरे. डॉ लक्ष्मीनारायण केशटवार पोतन्ना लखमावाड .संगम ग्रुप रत्नाळी. धर्माबाद तालुक्यातील समाज बांधवांनी व प्रतिष्ठित व शेतकरी गोर गरीब यांच्यासह अनेकांनी त्यांच्यावर कौतुकांचा वर्षाव केला आहे.

# संततधारमुळे अकोला जलमय

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** संततधार पावसामुळे अकोला जलमय झाला आहे. मेघगर्जनेसह रात्रभर काही भागात मुसळधार, तर काही ठिकाणी रिमझिम पाऊस सुरूच होता. जिल्ह्यात सरासरी ४९.१ मि.मी. पावसाची नोंद झाली. तेल्हारा तालुक्याला मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे. अकोला जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून वरुणराजाचा बरसत आहे. मंगळवारी दिवसभर जिल्ह्यातील विविध भागात तुरळक स्वरूपाचा पाऊस होता. या पावसामुळे सर्वत्र जलमय परिसर झाला आहे. नदी, नाले भरभरून वाहन असून प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. मूर्तिजापूर तालुक्यातील खरप ढोरे गावाला पुराने वेढा घातला होता. जिल्ह्यात काल १२९ मि.मी. सरासरी पाऊस पडल्याचे नोंद झाली. बुधवारी सकाळी १० वाजेपर्यंत ४९.१ मि.मी. सरासरी पाऊस कोसळला असून सर्वाधिक १०३.८ मि.मी. पाऊस तेल्हारा तालुक्यात झाला आहे. अकोट ३०.६, बाळापूर ४१.८, पातूर ३५.५, अकोला ४८.१, बार्शिटाकळी ५६.७ आणि मूर्तिजापूर तालुक्यात ३५.७ मि.मी. पाऊस पडला आहे. खरीप हंगामासाठी हा पाऊस पोषक ठरत आहे.



# भोकरला शिवसेनेचे जोडे मारो आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते किरीट सोमय्या यांची अश्लील चित्रफीत एका मराठी वृतवाहिनीने प्रसारीत करताच संतापाची लाट उसळली आहे.याच निमित्ताने मंगळवारी ( ता.१८ ) तालूका शिवसेना( उध्दव ठाकरे गट ) यांच्या कडून प्रतिमेस जोडेमारो अंदोलन करून निषेध व्यक्त केला आहे.

भाजपा दिवसेन दिवस जनतेत तेढ निर्माण करून स्वताचे हित साधते आहे. कीरीट सोम्मया हे मागील अनेक दिवसांपासून चर्चेत राहण्यासाठी अनेक ऊचाफती करीत आहेत. या निमित्ताने भारतीय जनता पक्षाचा खरा चेहरा जनतेसमोर आला. भाजपा महिलांचा सन्मान करुच शकत नाही हे भाजपा सोलापुर, परभणी येथील नेत्यांनी केलेल्या कृत्यावरुन दिसुन येते. त्यास भरीस भर म्हणून किरीट सोमय्या यांनी तर अश्लीलतेचा कळसच गाठला अशा निच प्रवृतीचा निषेध करण्यासाठी भोकर शिवसेनेच्या वतीने मंगळवारी डॉ.ब आंबेडकर चौकात किरीट सोमय्या यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करण्यात आले आहे. आंदोलनात उपजिल्हाप्रमुख सतिष देशमुख, तालुका प्रमुख माधव वडगावकर, शहर प्रमुख पांडुरंग वर्षेवार, नंदु पाटील कवठेकर, मनोहर साखरे, मारोती पवार, संभाजी पोगरे, सोहम शेट्टी, नागेश पिटलेवाड, रमेश यशवंतकर, सुनील जाधव, दीपक मेटकर, जगदिश गडदे, किशन गायकवाड, अनिल बनसोडे, गज्जू मेटकर व्यंकटेश सोनवडे,, महिला आघाडीच्या आनंदाबाई चुनगुरवाड, लक्ष्मण शितोळे, मोहन भाडेवाढ, सुरेश शेळके, सुनिल नरवाडे, राम भुरे, पवन चुनगुरवाड यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# सामाजिक कार्यकर्ते दीपक पाटील कानवटे यांच्या पुढाकारातून नाल्यांची साफसफाई

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** पावसाळ्याच्या तोंडावर लोहा पालिकेकडून केवळ कांहीं पुढारलेल्या वसाहतीसह दार्शनिक परिसरात नाल्यांची सफाई मोहीम काही कालावधीसाठी राबविली मात्र अनेक मागास भागातील गरीब नागरिकांच्या वस्तीत सफाई मोहीम राबविली नसल्याने पहिल्याच पावसात पालिकेच्या सफाई मोहिमेचे पितळ उघडे पडले. सदर गरीब वसाहतीतील नाल्या शेजारील वस्तीत नाल्याचे पाणी घरात घुसल्याने सदर परिस्थिती पाहून खुद्द सामाजिक कार्यकर्ते तथा युवा नेते दीपक पाटील कानवटे यांनी स्वखर्चातून नाल्यांची सफाई मोहीम राबविली. त्यांच्या कार्याचे नागरिकांतून कौतुक होत आहे. लोहा शहरातील सिद्धार्थ नगर भागातील सखल भागात पहिल्याच पावसाने सर्वत्र पाणीच पाणी झाल्याने तेथील युवकांनी सामाजिक कार्यकर्ते तथा युवा नेते दीपक पाटील कानवटे यांच्याकडे नाले सफाई संदर्भात पुढाकार घेण्याची विनंती केली असता तत्काळ तेथील नाले सफाई करून त्या भागातील नागरिकांना दिलासा दिला. त्यानंतर रविवारी झालेल्या पावसाने इंदिरा नगर भागातून जाणारा नाला तुंबून नाल्यातील घान पाणी कचरा हा इंदिरा नगर भागातील गुरुकृपा प्राथमिक शाळा तसेच परिसरातील नागरिकांच्या घरात तसेच अंगणात साचल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. पालिकेकडून सफाई मोहीम वारंवार सांगून देखील होत नसल्याने इंदिरा नगर भागातील कांहीं तरुणांनी दीपक पाटिल कानवटे यांची भेट घेवून सहकार्य करण्याची विनंती केली असता दीपक पाटील यांनी तत्काळ स्वखर्चातून नाल्यांची सफाई मोहीम राबविली. त्यांच्या कार्याची सध्या लोहा शहरात जोरदार चर्चा सुरू असून शहर वाशियांतुन कौतुकाचा वर्षाव होत आहे.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी)
9860481142
7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी
9850017181

वितरण स्थितीसाठी
9021395308

घाऊक चौकशीसाठी
7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर